ती कशी हळू हळू पालटत गेली हें पाहूं. माधवराव हे शाळेंत मास्तरचें काम करीत असतां, कलेक्टर साहेबाचे चिटणीस चिदंबर केशव गाडगीळ हे शिरडीस आले आणि माधवरावांना भेटून त्यांना विचारलें कीं, येथें एक मोठा साधु आहे असें म्हणतात तो कोठें आहे? माधवरावांनीं उत्तर दिलें कीं, येथें तसा साधु कोणी नाहीं, आणि शाळेंतून मशीदीकडे बोट दाखवून सांगितलें कीं, तेथें हा एक वेडा फकीर आहे. पुण्यांत भीमाशंकर देवालयांत एक साधु रहात असे. त्याला मान देऊन श्री. गाडगीळ हे त्याची पूजा करीत असत. शिरडीस जाऊन तेथील मोठ्या साधूचें दर्शन घे, असें त्या साधूनें सांगितल्यामुळें श्री. गाडगीळ कांहीं मंडळीसहीत शिरडीस आले, आणि माधवराव यांनीं हा वेडा फकीर मात्र येथें आहे, साधु कोणी नाहीं असें सांगितलें, तरी ते बाबांच्या दर्शनास गेले. बाबा त्या सर्व मंडळीवर खूप संतापले, रागावले, शिव्यागाळींचा वर्षाव केला; त्यांतील माथितार्थ एवढाच होता कीं, मी साधु नाहीं, मुसलमान आहे, भीमाशंकर देवालयांतील साधूकडे चला आणि त्यांचे पाय धरा. बाबांच्या या क्रोधाविर्भावाचा सर्वांच्या मनावर चांगला परिणाम झाला. श्री. गाडगीळ यांची खात्री पटून समाधान झालें आणि वरचेवर बाबांच्या दर्शनास येऊन ते बाबाचे परम भक्त झाले.

## श्रद्धा कशी जडली ?

बाबा शिरडीस आले त्यावेळीं तेथें देवीदास नांवाचे सत्पुरुष होते. त्यानंतर जानकीदास नांवाचे महानुभावी गोसावी शिरडींत आले. बाबाचें या 'उभयतांसी मोठें प्रेम। बैठकी होती नित्य नेम॥ ऐसा तयाचा नित्य नेम। सुख परम सर्वा लोकां॥ श्रीसाईसच्चरित ५–३६– श्री अक्कलकोट महाराज (समाधि १८७८) यांचे आनंदस्वामी नांवाचे एक भक्त होते. त्यांनीं येवल्यानजीक सावरगांव येथें एक मठ स्थापन केला होता. १८८५ सालीं माधवराव आणि नंदराम मारवाडी त्यांच्या भेटीस (दर्शनास, गेल्यावेळीं ते अजमासें ९५ वर्षें वयाचे असावेत. ते कौपीनधारी असून मोठे साक्षात्कारी होते. भेटीनंतर ते माधवरावाबरोबर शिरडीस आले आणि म्हणाले पाहूनि साईस समक्ष। '**हिरा हो प्रत्यक्ष हा हिरा**' (अ. ५·४२) ध्यानांत ठेवा हे माझे बोल। पुढें तुम्हांस आठव येईल। (अ. ५·४४). असें भाविष्य सांगून ते येवल्यास परतले. यानंतर कांहीं कालानें पुणतांब्याचे गंगागीर महाप्रसिद्ध वैष्णववीर (गृहस्थाश्रमी) शिरडीस आले. त्यांनीं नाममंत्राचा सप्ताह आणि होम केला आणि उभय हातांनी मातीच्या घागरी पाण्यानें भरून आणून बाग करीत असलेल्या बाबांना पाहून त्यांना फार आश्चर्य वाटलें आणि साईची दृष्टादृष्ट होतांच ते वदले कीं —'धन्य शिरडीचें भाग्य वरिष्ठ। जोडलें श्रेष्ठ हें रत्न। (अ. ५·३९) या आणि इतर नानासाहेब चांदोरकर सारख्या सत्पुरुषांच्या अनुभवाचा व उक्तीचा माधवरावांचे मनावर सुपरिणाम होत गेला. त्या पूर्वींही आपली बाबावर श्रद्धा कशी जडली हेंहि त्यांनीं सांगितलें आहे. शिक्षक असतांना ते

शाळेंत झोंपत असत. बाबा त्यावेळीं, एकटेच मशीदींत असत. रात्रौ मशीदींतून इंग्रजी, हिंदी, संस्कृत आणि इतर भाषांतील बोल (हे बाबाशिवाय कोणाचे असणार?) मला स्पष्ट ऐकूं येत असत. त्यावरून बाबांना अलौकिक सिद्धि प्राप्त झाल्या आहेत अशी माझी खात्री पटली आणि तेव्हां पासून त्यांचे ठिकाणीं माझी श्रद्धा जडली आणि पुढें ती एकसारखी वाढत गेली, असें ते सांगत. यामुळें त्यांची पुढील २०।२२ वर्षें बाबा हे देवकोटींतील सिद्ध पुरुष असून मूर्तिमंत सगुण परमात्मा आहेत अशा दृढ भावनेंत, आणि बाबांच्या आज्ञाधारकपणांत, आणि भक्तवृंदाच्या सेवेंत व शुश्रूषेंत गेलीं. याप्रमाणें माधवरावांची सुमारें ४२–४३ वर्षें अव्याहतपणें सतत बाबांच्या निकट सहवासांत गेलीं. माधवराव नेहमीं बाबांना देव किंवा देवा म्हणून संबोधीत असत आणि बाबा त्यांना श्याम–श्यामा या अन्वर्थक नांवानें पुकारीत असत. याची कांहीं प्रेमाचीं–सलगीचीं, अरे तुरेचीं उदाहरणें देतां येतील.

## सलगीचीं उदाहरणें

एकदां एकादशीस बाबांचे हातावर एका भक्तानें ताजा ऊन ऊन जोंधळ्याचा हुरडा ठेविला. बाबा म्हणाले, 'श्यामा, हा घे तुला! माधवराव रागाच्या अविर्भावानें म्हणाले–' देवा, तुला कांहीं लाज वाटते कारे, आज धडधडीत एकादशी आणि तूं हें मला असलं हुरडा खाण्याचें पाप करायला सांगतोस. मी नाहीं घेत जा.' बाबा म्हणाले–बरं नको खाऊं शाम्या!

तसेंच एकदां एका भक्तानें विचारलें कीं, बाबा, एकादशीस कांदा खावा, कां न खावा? बाबा म्हणाले–खाऊं नये. तो भक्त म्हणाला–' बाबा, कांदा तर कंद आहे, मग खायला काय हरकत आहे.'

(पान ३८ वर पहा)

● वनांतून फिरतां फिरतां श्रीरामचंद्र एकदां पंपासरोवरावर पाणी पिण्यासाठीं गेले. धनुष्यबाण कांठावर जमीनींत रोवून ठेवून ते सरोवरांत उतरले. वर येऊन पाहतात तों धनुष्यानें जखमी झाल्यामुळें एक बेडूक रक्तबंबाळ होऊन पडला आहे. रामचंद्र अत्यंत दुःखित होऊन त्याला म्हणाले, 'तूं ओरडला कां नाहींस! आवाज केला असतास तर मला समजलें असतें व तुझी ही अशी दशा होती ना!' 'बेडूक म्हणाला,' रामा! संकट ओढवतें त्यावेळीं 'रामा रक्षण कर' असा आम्हीं धांवा करितों. आतां स्वतः रामच मारायला निघाला तर धांवा तरी कुणाचा करावा!'

( पान ३७ वरून )

बाबा म्हणाले—'खावा तर मग.' इतक्यांत तेथें हजर असलेले माधवराव आश्चर्य-युक्त मुद्रेनें मोठ्यानें म्हणाले—देवा, असलं कसलं रे हें तुझं संदिग्ध, दुटप्पी बोलणें. एकदां कांदा खाऊं नये असें म्हणतोस आणि पुन्हां सांगतोस खावा म्हणून. काय तें खरें सांग ना. बाबा म्हणाले—शाम्या मशीदींत बसून मी खोटें बोलत नाहीं. तुझ्या पायाची आन ( आण = शपथ ). मी सांगतों कीं, एकादशीस कांदा खाऊं नये आणि खावयाचाच असेल तर तो सबंध खावा. पण ज्याचे अंगांत सबंध कांदा खाऊन तो जिरविण्याची ताकद असेल त्यानेंच खावा, इतरानें खाऊं नये.

एकदां माधवरावांनीं प्रश्न केला—देवा, रामायणांत लिहिलं आहे कीं, रामानें लंकेवर स्वारी करतेवेळीं एक कोटि वानर जमा केले होते. हें खरं काय रे देवा? रामहि खरा काय रे? बाबा म्हणाले,—'शाम्या हें समदं खरें आहे, खरं आहे बरं कां.' माधवराव म्हणाले—'देवा हे एक कोटि वानर कुठं व कसं बसले होते रे?' बाबा म्हणाले—'ते समदे वानर झाडांवर मुंग्यावाणी बसले होते बरं कां श्याम्या!' माधवराव म्हणाले—'देवा हें त्वा डोळ्यानें पाहिलें कां रे'? बाबा म्हणाले—'हो हो म्यां डोळ्यानें पाहिलें बरं का श्याम्या.' माधवराव म्हणाले—देवा तुझी ही लोणकडी थाप आहे. तूं तर माझ्या समक्ष इथं आलास, अन मग तूं ते वानर केव्हां रे बघायला गेला होतास'? बाबा म्हणाले—श्याम्या, तुझ्या माझ्या फार पिढ्या झाल्या, त्या समद्यांचा मला आठव आहे, तुला नाहीं.' माधवराव म्हणाले—'देवा तूं इतका पुराना आहेस कां रे?' 'होय, यांत कांहीं खोटं नाहीं, तुझी शपथ श्याम्या' असें बाबा म्हणाले.

**देवाची हजेरी आणि खरडपट्टी**

भक्तांकडून बाबांना रोज जी कांहीं दक्षिणा मिळत असे त्या रकमेंतून तात्या पाटील, रामचंद्र पाटील, बडेबाबा, बयाजी पाटील वगैरे भक्तांना बाबा रोज कांहीं रक्कम देत असत. भगत म्हाळसापति आणि माधवराव यांना मात्र कांहीं देत नसत. सर्व भक्तांमध्यें माधवराव बाबांचे फार लाडके आणि बोलके. ते एकदां बाबांना म्हणाले, देवा, तूं फार उदार आहेस असें लोक म्हणतात. तूं कोनाला जमीनजुमला, कोनाला बायको, कोनाला संतति, कोनाला पैका, कोनाला विद्या देतोस, आन आम्ही तुझ्या पायापाशीं राहून नेहमीं आपत्ति भोगतों. तमाखु पियाला सुद्धां तूं कधीं आम्हाला दिडकीहि देत नाहींस. हें असं कसं रे देवा! मी तर म्हणतों कीं, तुझ्या-सारखा खट्याळ आणि भिकारडा देव साऱ्या दुनियेंत नाहीं. डोईला फडकं गुंडाळतोस, मशीदींत धुनि पेटवून बसतोस, चिलीम फुंकतोस, आन गांवांत तुकडे मागून आणून खातोस, तो तूं रे काय आम्हांस देनार? मला तर वाटतं, तूं मोठा कृपण नि करंटा आहेस, देवा! तूं देव देव म्हणून मिरवतोस, तुला देव कुनी रे केला, देवा! अरे तुला देव आम्हींच केला, नाहीं तर तुला भिकमाग्या फाकिरड्याला इचारीत कोन होतं रे देवा? माधवराव कसेंहि बोलले तरी बाबांना त्याचें कौतुकच वाटे. तेव्हां बाबा म्हणाले—'पैसा अडका तुझ्याकरितां नाहीं बरं कां

शाम्या ! तुझ्याकरितां न्यारंच आहे.' माधवराव खूण समजले व स्वस्थ बसले.

एकदां माधवरावांचे डोळे आले आणि सुजले; खूप ठणका लागला. माधवरावानें पुष्कळ औषधोपचार केले, पण गुण येईना. तेव्हां ते बाबाकडे आले आणि संतापून म्हणाले–देवा, तुझ्यासारखा दुष्ट, नष्ट, खट्याळ देव कुणी नाहीं. लोकांना दवा देतोस, त्यांची व्याधी नाहींशा करतोस, आणि आज चार दिवस माझे डोळे सुजून जबरदस्त ठणका लागला आहे आणि मी एकसारखा ओरडतो, ओरडतों तरी तुला लाज नाहीं वाटत कां रे ? तूं आंधळा कां बहिरा झालास ! अरे तुला दिसत कसं नाहीं आणि ऐकायला पण कसं येत नाहीं. असला कसला तूं देव. बघ देवा जर कां माझे डोळे उद्यां सकाळीं बरे नाहीं झाले तर तुला मी मशीदींतून हांकलून लावीन तरच मी नांवाचा शामा ! बाबा म्हणाले–उगाच वटवट करूं नको शाम्या. सात मिऱ्याचे दाणे पाण्यांत उगाळ आणि दे डोळयांत घालून म्हणजे बघ तुझे डोळे भिंगावाणी होतील, जाय, जाय उदी घे. माधवराव खूप संतापून म्हणाले—'देवा, तूं तर फार शहाणा दिसतोस रे !' अरे ही वैदुगिरी तूं कुठें शिकलास देवा ! मिरें वाटून डोळ्यांत घालून घेऊन मी आपले डोळे फोडून घेऊ होय ? बाबा शांतपणें म्हणाले, 'उदी घेऊन जा, फार शहाणपणा करूं नको. अगोदर करून पहा, नंतर गुण न आला तर रागाव ?' माधवराव असे बोलले तरी बाबांचे शब्दावर त्यांचा पूर्ण भरंवसा असे. माधवरावांनें त्याप्रमाणें केलें आणि त्यांचे डोळे तावडतोब पूर्ण बरे झाले.

[**टीप** : सूचना–औषधांपेक्षां **बाबांच्या शब्दांत** अधिक सामर्थ्य होतें. त्यामुळें माधवरावांचे डोळे बरे झालें, हें ध्यानांत ठेवून भक्तांनीं डोळे आल्यावेळीं मिऱ्याचें पाणी वापरण्याविषयीं सावधान असावें.]

**माधवरावांचे हुकूम** : रोज दुपारची बाबांची आरति झाली म्हणजे माधवराव मोठ्यानें बाबांना दरडावून म्हणत असत, 'देवा ऊठ, देवा उठ, चल आपल्या जागेवर आणि तेथें बसून नैवेद्यांचा (भक्तांनीं अर्पण केलेल्या खाद्यपदार्थांचा,) काला कर आन् दे समद्यांना वाटून. असें माधवरावांनीं म्हटल्याबरोबर बाबा हूं कीं चूं न करतां आपल्या नेहमींच्या आसनावरून उठून निंबराजवळ जाऊन बसत आणि माधवराव सांगतील तसें करीत. माधवरावांचे बोल बाबांना गोड लागत. माधवरावांचे जणूं काय त्यांना वेडच लागलें होतें.

**माधवरावांना द्वारकामाई अहोरात्र खुली** : सायंकाळ झाल्यावर ३।४ स्पेशल भक्तांखेरीज इतरांना मशीदींत (द्वारकामाईत) जाण्यास सक्त मनाई असे. पण हा नियम माधवरावांना लागूं नसे. एकदां असे झालें कीं, तात्यासाहेब नूलकर नांवाचे एक भक्त शिरडींत बरेच आजारी पडले. त्यांचें देहावसानसमयीं रात्रौ बारा वाजून गेल्यावर बाबांचें चरणतीर्थ सेवन करावें अशी त्यांना प्रबल इच्छा उत्पन्न झाली. पण अशा समयीं बाबाकडे जाऊन त्यांचें चरणतीर्थ कोण आणणार ? माधवरावांनीं ही कामगिरी पत्करली. रात्रौ ते मशीदींत गेले. बाबा त्याचेवर खूप रागवले आणि मारण्याच्या आवेशानें एक

पाय पुढें करून उभे राहिले. माधवरावांनीं सर्व हकीगत सांगितली आणि बाबांच्या क्रोधाच्या आविर्भावाला न जुमानतां पुढें केलेल्या पायाचा आंगठा पंचपात्रींतील पाण्यांत बुडवून घेतला आणि तें तीर्थ आणून तात्यासाहेब नूलकरांची शेवटची इच्छा पुरी केली.

**बाबांचें माधवरावांवर अकृत्रिम व अवर्णनीय प्रेम.** बाबांनीं माधवरावाला जरी कांहीं संपत्ति दिली नाहीं, तरी त्यांचेवर बाबांचें अवर्णनीय प्रेम होतें. कांहीं भक्त आपणास बाबांचा प्रसाद मिळावा या हेतूनें कांहीं प्रिय व सुंदर वस्तु बाबांचे हातीं देत आणि बाबांच्या हस्तस्पर्शानंतर ती परत मागत. पण बाबा त्यांना त्या सर्व वस्तु परत न देतां त्यांपैकीं कांहीं उत्तम निवडक वस्तु माधवरावांना देत असत. उदाहरणार्थ, वामन नार्वेकर या भक्तानें एका बाजूवर राम–लक्ष्मण–सीता आणि दुसऱ्या बाजूवर बद्धांजली मारुती कोरलेला असा असा एक रुपया बाबांना अर्पण करून तो त्याच्या हस्तस्पर्शानें पुनीत होऊन परत मिळावा म्हणून पुढें केला. पंचवीस रुपये देईल तर तो कोरलेला रुपया मी त्याला परत देईन असे बाबा बोलले. नार्वेकरानें पंचवीस रुपये आणून पुढें ठेवलें तरी बाबा म्हणाले–'तरी त्या रुपयासवें न तोले। ऊणें तें मोलें तयापुढें ॥ १८८ ॥ म्हणती श्यामा हा तूं घेई। असूं दे अपुले संग्रहीं ॥ देव्हाऱ्यामाजी ठेवून देई। करीत जाई पूजन ॥ १८९ ॥ (श्रीसाईसच्चरित अध्याय २९) याप्रमाणें श्री. एकनाथ भागवताची पोथी, श्री. विष्णु सहस्रनामाची पोथी, चांदीच्या बाबांच्या पादुका, बाबांची शाडूची सुंदर मूर्ति इत्यादि वस्तु बाबांनी माधवरावाला देऊन टाकिल्या होत्या.

तसेंच दररोजच्या दुपारच्या नानाविध नैवेद्याचा काला करून बाबा सर्वांना वांटून देत, पण माधवराव तो सबगोलंकृत काला खाणार नाहींत हें समजून सर्वांचें काला–भोजन आटोपल्यावर माधवरावांना हापूसच्या आंब्याच्या फोडींनीं भरलेली बशी बाबा नित्य–नेमानें माधवरावाला देत असत.

**माधवरावांचे लाड व लळे:** माधवरावांना बाबांनीं तात्या पाटील, बडे बाबा, रामचंद्र पाटील वगैरे मंडळी प्रमाणें दररोज पैसे दिले नाहींत किंवा कधीं एकदम कांहीं म्हणण्याजोगी रक्कम दिली नाहीं. इतकेंच नव्हे तर श्री. शिंदे सरकार (कै. श्री. माधवराव साहेब) त्यांना पांच हजार रुपये देत असतां त्यांना तेहि देऊं दिले नाहींत; तरी पण ऐहिक संपत्तीपासून उपभोगण्यास मिळणारे नाना प्रकारचे भोग व ऐश्वर्य त्यांना भोगावयास देऊन बाबांनीं माधवरावांचे पुष्कळ लाड व लळे पुरविले. अति खर्चाच्या व अत्यंत श्रमाच्या व दगदगीच्या (द्वारका, रामेश्वर जगन्नाथ, बद्रीनारायण, बद्रीकेदार, गंगोत्री, जम्नोत्री वगैरे) चारी धामांच्या, व काशी अयोध्या, मथुरा, गोकुळ, वृंदावन, प्रयाग, गया, हरिद्वार, उज्जैन, गिरनार, नाशिक, त्रिंबकेश्वर, गाणगापूर, अक्कलकोट, पंढरपूर, बालाजी, श्रीरंगपट्टण, कांची, कामाक्षी मदुरा, मिनक्षी इत्यादि पूज्य व महत्वाच्या यात्रा बाबानीं अनायासें माधवरावांना

(पान ४२ वर पहा)



# बोधिवृक्षाची हांक

अशा अमृतघडीला
येतें सिद्धार्थाला जाग,
व्योम व्यापाया उठते
त्याच्या अंतरींची आग.
उघडतां नयनांच्या
त्यानें गोंडस पाकळ्या,
मनीं त्याच्या हिंदोळती
पत्नीपुत्राच्या सावल्या.
परी आहे अंतरांत
वडवाग्नि पेटलेला;
त्यांत त्याच्या संसाराचा
राजवाडा करपला.
शेज सोडून आपली
येतो यशोधरेपाशीं,
तिचें लावण्य देखून
क्षण थबके राजर्षि.
आहे तिचा एक कर
अंगावर राहुलाच्या,
माया मातेची देखून
वृत्ती हरखती त्याच्या.
वाटे उगीचच त्याला
याला उचलून घ्यावें,
याला कवळावें घट्ट,
एकसारखें चुंबावें.
नाहीं...नाहीं...मन मोही
नश्वराची महामाया,
क्षण नाहीं थबकणें
जरामृत्यूच्या गेहीं या.
निघा, निघा, बोधिसत्त्वा,
रात्र आली डोईवर,
आली निर्वाणाची घडी,
वाट पाहे शुभंकर.
तथागता, नाहीं येथें
चित्त तुझें ठरणार,
होणें आहे तुला बुद्ध
आणि जाणणें ईश्वर.
आहे तुला सोडविणें
कोरें कोडें भिकाऱ्याचें,
आलें आहे आमंत्रण
अपंगाचें...त्या प्रेताचें.
आहे द्यावयाचें तुला
मरणाला रे आव्हान,
अमृतत्वाला करणें
युगेंयुगें आवाहन.
विश्वमंगलार्थ तुला
तुझा जाळणें संसार,
राखेवर त्याच्या, मुने
तुला पूजिणें ईश्वर !
घ्याल कदाचित वेध
आदि आणि अनादीचा,
परी प्रश्न न सुटणें
यशोधरेच्या अश्रूंचा !
रात्र आली डोईवर,
पात्र घडीचें भरलें !
निघा...निघा...बोधिसत्त्वा
मागें कांहीं न राहिलें।
चला तीर्थंकरा...चला
कृतकृत्यार्थ होण्याला,
अतळाचा तळ काढा
संसार हा झाला शिळा !...

—सदानंद रेगे

( पान ४० वरून )

आनंदांत, सुखांत व ऐषआरामांत कोट्याधीशांचे व लक्षाधीशांचे सहवासांत सुखानें करून दिल्या. हत्तीचे अंबारींत बसून त्यांची मिरवणूक काढविली. मोठमोठे संस्थानिक, जहागिरदार, इनामदार राजकारणी विभूति, मोठमोठे सरकारी अधिकारी व सुखवस्तु लोक यांचे माधवरावांना कांहीं प्रसंगीं सन्मान्य पाहुणे बनवून त्यांना माधवरावांना प्रेमालिंगन घ्यावयास लावून माधवरावांचे पाया पडावयास लाविलें. मग माधवरावाच्या फिरण्याच्या, खाण्यापिण्याच्या व ऐषआरामाच्या थाटांस काय विचारावें! या सर्व ठिकाणीं बाबांच्या लीला वर्णन करून सर्वांचीं मनें प्रसन्न, प्रफुल्लित व आनंदित करणें व बाबांची प्रसिद्धि करणें हीच माधवरावांची मुख्य कामगिरी होती आणि ती त्यांनीं चोख बजाविली. भक्तावतंस नानासाहेब चांदोरकरांनींहि ही कामगिरी बजाविली होती. पण ते सरकारी नोकरींत असल्यामुळें त्यांचें प्रचारकार्य मर्यादित होतें. पण माधवरावाचें कार्य आसेतु हिमाचलापर्यंत व आद्वारका जगन्नाथापर्यंत झालें असें म्हणण्यास हरकत नाहीं.

**माधवरावांना ब्रह्मलोक, विष्णुलोक आणि शिवलोक यांचें दर्शन :**

एकदां माधवराव बाबांना म्हणाले कीं—, देवा ब्रह्मलोक, विष्णुलोक आणि शिवलोक हे खरे आहेत काय? ‘होय, खरे आहेत श्याम्या’ असें बाबा म्हणाले. ‘मग देवा, तूं ते आम्हांला कां दाखवीत नाहींस रे’ असे माधवरावांनीं म्हणतांच बाबांनीं त्यांना डोळे मिटण्यास सांगितलें आणि कांहीं वेळानें ते उघडण्यास सांगितलें. तेव्हां स्वर्गीय, दैदिप्यमान, वैभवयुक्त भव्य विस्तृत रत्नजडित सिंहासनाधिष्ठित ब्रह्मदेवासह मोठी सभा दिसली. नंतर पुनः डोळे मिटल्यावर त्यांना क्रमानें वरीलपेक्षां अधिक सौंदर्य व ऐश्वर्य यांनीं युक्त रत्नजडित सिंहासनाधिष्ठित श्री विष्णूच्या मूर्तिसह मोठी भव्य सभा दिसली आणि त्यानंतर पुनः डोळे मिटल्यावर अत्यंत प्रेक्षणीय विलोभनीय, नयनसुभग अशा रत्नजडित सिंहासनाधिष्ठित श्री शंकराच्या मूर्तिसह अत्यंत भव्य सभा दिसली. त्यानंतर बाबा म्हणाले—ऐहिक ऐश्वर्याप्रमाणें हें देवांचें ऐश्वर्यहि तुच्छ आहे. पण श्याम्या, हें आपल्याकरितां नव्हे, आणि तें आपल्याला नको. आपल्याकरितां निराळेंच कांहीं आहे, हें ऐकून माधवरावांना समाधान वाटलें.

**माधवरावांचा बाबांवर अनृताचा आरोप :** एकदां माधवराव बाबांपाशीं बसले असतां एक इसम बाबांजवळ पैसे मागण्याकरितां आला. तो मशीदींत येण्यापूर्वीच बाबांनीं आपल्या खिशांतील पैसे आपल्या आसनाखालीं ठेविले आणि त्याला म्हणाले, ‘आपल्याजवळ पैसेबैसे नाहींत बुवा.’ असें सांगितल्यावर तो इसम निघून गेला. हा बाबांचा सर्व खेळ पाहून माधवराव म्हणाले, काय रे देवा, तूं तर आम्हांला सांगतोस कीं खोटं बोलू नये, अन् तूं रे हें खोटें कसें बोलतोस देवा, आसनाखालीं पैसे लपवून ठेवितोस आन त्याला म्हणतोस पैसे नाहींत बुवा. तूं मोठा चांगला देव दिसतोस. बाबा म्हणाले—पैसे द्यावयाचें नसले म्हणजे असं करावं आणि बोलावं

लागतं. यांत कसलं ' खरं ' खोटें बोलणें आहे शाम्या !

**बाबांवर चोरीचा आरोप, पण बाबांचा माधवरावांवर अनुग्रह :** एकदां मशीदींत एक रामदासी विष्णुसहस्त्रनामावर्तन आणि अध्यात्मरामायण यांचें पारायण करीत असें. त्यावेळीं माधवरावांची सेवा फळल्यामुळें त्याला कांहीं भक्तिमार्गाचा प्रसाद देऊन त्यांचेवर अनुग्रह करावा असें बाबांच्या मनांत आलें. तेव्हां बाबांनीं एक युक्ति योजिली. त्यानें त्या रामदास्याला सांगितलें कीं, माझ्या पोटांत फार कळ उठली आहे, आंतडीं तुटून पडतात कीं काय असें झालें आहे. तेव्हां बाजारांत जाऊन सोनामुखी घेऊन ये. तेव्हां रामदासी धांवत बाजारांत सोनामुखी आणण्यासाठी गेला तेव्हां बाबांनीं त्याचा रुमाल सोडून त्यांतील विष्णुसहस्त्रनामाची पोथी काढून घेतली आणि तो द्वारकामाईंत परत येण्यापूर्वीच ती माधवरावांजवळ देऊन बाबा हंसत हंसत म्हणाले— शाम्या ही ठेव तुला पोथी— ' शामा ही पोथी कनी । आहे पहा बहु गुणी । म्हणून देतो तुज लागुनी । ती त्वां वाचून पहावी ॥ ७४ ॥ त्यावर माधवराव संतापून म्हणाले,—देवा तूं सुद्धां पोटदुखीचें ढोंग करून अशा चोऱ्या करितोस कां; बाबा म्हणाले—शाम्या, अरे ही कसली चोरी व हें कसलें खोटें बोलणें, शाम्या ही रोज वाचीत जा बरं कां रे; माधवराव म्हणाले कीं— देवा, माझ्या वाणीला संस्कृताचा गंध नाहीं. मला ही विष्णुसहस्त्रनामीचा पोथी कशी रे वाचतां येईल ? बाबा म्हणाले— येईल वाचतां श्याम्या, जा वाचायाला लाग. नंतर माधवरावांनीं फार मेहनत करून, बाबांचें आज्ञेवर भरवसा ठेवून चांगल्या संस्कृतज्ञ भक्तमंडळीकडून त्या उत्तम पोथीची संथा घेतली. आणि शुद्ध व स्पष्ट उच्चारयुक्त विष्णुसहस्त्रनाम मुखोद्गत केलें, आणि बाबाचे आज्ञेप्रमाणें आपले देहावसान होईपर्यंत नित्यनेमानें तें दररोज न विसरतां म्हणत असत. पुढें ते यांत इतके प्रवीण झाले कीं, त्यांनी श्री. काकासाहेब दीक्षित आणि पुणें इंजीनीयरींग कॉलेजचे प्रोफेसर श्री. गणेश गोविंद नरके एम्. ए. एम्. एस् सी यांचे सारख्या विद्वानांना विष्णु सहस्त्रनामाचा अर्थ समजावून सांगितला. ' पुढें शामाची निष्ठा जडली। दीक्षित नरक्यांशीं संथा दिधली ॥ अक्षर ओळख करून घेतली। पोथी चढली जिव्हेवर ॥ ' ( श्रीसाईसच्चरित, अ. २७-१२९ ) अशा तऱ्हेनें बाबांनीं माधवरावांवर अनुग्रह केला.

**चोरीबद्दल माधवरावांस शिक्षा :** बाबाचें टपालाचें काम, म्ह. पत्रें घेणें, तीं बाबांना वाचून दाखवून त्यांचीं उत्तरें लिहिणें, मनी आर्डरी घेणें वगैरे कांहीं दिवस माधवरावांकडे होते. या मुदतींत एकदां एका भक्तानें बाबांना देण्यासाठीं दोन रुपयाची मनि-ऑर्डर पाठविली. ती माधवराव नें घेतली, पण ती रक्कम बाबांकडे न देतां द्वारकामाईच्या बाहेरील भिंतीजवळ पुरून ठेविली. या गोष्टीस बरेच दिवस झाले. त्यानंतर एके रात्रीं माधवरावांचे घरीं दोन अडीचशें रुपयांची चोरी झाली. तेव्हां माधवराव दुःखी होऊन तळमळूं लागले. पुष्कळ तपास केला, पण चोरीचा पत्ता लागला

नाहीं. शेवटीं ते बाबांच्या दरबारांत येऊन त्यांनीं आपलें गाऱ्हाणें बाबांपुढें मांडलें. ते म्हणाले, देवा हे बघ माझी गरीबांची दोन अडीचशें रुपयांची चोरी झाली, यांचें तुला कांहीं वाटत नाहीं का रे? तुझ्यावांचून आम्हीं आमचें गाऱ्हाणें कोणाकडे न्यावं रे देवा! बाबांनीं तें सर्व म्हणणें शांतपणें ऐकून घेतलें आणि शांतपणानें म्हणाले कीं, शाम्या यात काय आहे रे? तुझ्या चोरीचें गाऱ्हाणें तूं मजकडे घेऊन आलास, पण माझी दोन रुपयांची चोरी झाली त्याचें गाऱ्हाणें मी कोणाकडे नेऊं रे शाम्या? माधवराव समजले आणि म्हणाले तर मग देवा, माझी चोरी त्वांच करविली काय रे? अरे तूं मोठा खट्याळ आहेस. तुझ्या दोन रुपयाकरितां मला गरीबाला दोन अडीचशें रुपयांची शिक्षा काय रे? अरे हा कां न्याय आहे तुझा रे देवा? बाबा म्हणाले—'शाम्या, तुला जशी दोन अडीचशें रुपयांची किंमत तशीच मला फकीराला दोन रुपयांची किंमत.' माधवराव हें ऐकून गप्प बसले.

**माधवरावांची सख्यभक्ति :** भागवतांत वर्णन केलेल्या—'श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनं! अर्चनं वंदनं दास्यं सख्यमात्मनिवेदनं' या नवविधा भक्तींपैकी माधवरावांची बाबांवर आठवी म्हणजे सख्यभक्ति होती. इतर भक्तांप्रमाणें माधवराव बाबांची नित्य पूजा करीत नसत, त्यांना न्याहारी व नैवेद्य देत नसत; पण बाबांवर त्यांची अलोट, अनन्य एकनिष्ठ व निस्सीम भक्ति होती. त्यांनीं बाबांच्या आज्ञेप्रमाणें बाबाकरितां अठरा वर्षें ओली भिक्षा मागितली. त्यांचे जिव्हेवर बाबांचें नांव निरंतर नाचत असे. त्यांना बाबांबद्दल अत्यंत आदर व प्रेम वाटे. बाबांवर त्यांची विलक्षण श्रद्धा असे. देवाशीं आपण अतिशय सलगी केली, थट्टा मस्करी विनोद वगैरे प्रकार केले, देवाला अरे तुरे केलें, त्याचेशीं भांडलों, रागावलों, रुसलों, हट्ट केले, त्यांचेवर नाना प्रकारचे आळ घातले, अवाच्य असें पुष्कळ टोंचून बोललों, या सर्व गोष्टींची आठवण होऊन त्यांना केव्हां केव्हां वाईट वाटे व पश्चात्ताप होई. तेव्हां त्यांना रडूं कोसळे आणि त्यांच्या नेत्रांतून अश्रुधारा सारख्या वाहत, कंठ सद्गदित होई व अंतःकरण भरून येई, तेव्हां ते म्हणत—माझ्या देवासारखा सर्वव्यापी, सर्वशक्तिमान् सर्वज्ञ, महापराक्रमी प्रेमळ असा चालतां बोलतां हासतां खेळता देव या जगांत पुनः कधीं दिसणार नाहीं. लाड व कोडकौतुक पुरवावे तर तें माझ्याच देवानें. देवा, मीं तुला न ओळखतां, न जाणतां जे अनंत अपराध केले ते सर्व क्षमस्व. याप्रमाणें ते कित्येक वेळां दुःखी होत आणि त्यांना हरघडी बाबांच्या लडिवाळपणाची आठवण येई.

**माधवरावांचा स्वभाव :** माधवराव स्वभावानें तापट, पण मनमिळाऊ, प्रेमी, परोपकारी, सच्छील, निर्मळ, धार्मिक आणि व्यवहारांत मुत्सद्दी असत. त्यांचे ठिकाणीं कांहीं दोषहि असतील, पण बाबांच्या कृपेनें त्यांचे दोष झांकले जाऊन त्यांच्या अंगाच्या गुणांचीच छाप इतर भक्तावर पडत असे आणि त्यामुळें बाबांचे सर्व भक्त त्यांना मान देत असत.


**माधवरावांना उदीचा दृष्टान्त :** बाबांच्या हातची पवित्र उदी जवळजवळ

मातीचे दोन मोठे डेरे भरून काळजी-पूर्वक पुण्यभावनेनें घरांतील खोलीचे कोपऱ्यांत माधवरावांनीं संग्रहीं ठेविली होती. बाबा समाधिस्त झाल्यावर त्याच डेऱ्यांतील उदी ते प्रसंगविशेषीं सर्वांना देत. ह्या डेऱ्यांत पवित्र उदी ठेविली आहे असें घरांतील मंडळींना माहीत नव्हतें. माधवराव एके वेळीं मुंबईस गेले असतां, घरांतील घाण बाहेर काढून टाकून देण्याच्या उद्देशानें ते डेरे बाया-माणसांनीं बाहेर काढून ठेविले. तेव्हां माधवरावांना मुंबईस बाबांचा दृष्टान्त झाला कीं—'श्याम्या, तुझ्या घरांत तूं जपून ठेविलेली माझे हातची उदी उकिरड्यावर चालली आहे रे, तूं जा लवकर व ती नीट राखून ठेव.' माधव-राव खडबडून जागे झाले व ही देवाची सूचना आहे असें समजून ते ताबडतोब शिरडीस परत आले व चौकशीअंतीं स्वप्नदृष्टांतातील गोष्ट खरी असें ठरलें. नंतर त्यांनीं ती उदी माडीवर आपल्या ताब्यांत ठेविली. ती अद्यापावेतों त्यांचे राहते घरीं आहे.

**माधवरावांना मदत** : माधव-रावांची योग्यता जाणून कै. काकासाहेब दीक्षितांनीं आपल्या वाड्यांत कांहीं खोल्यांत राहण्यास माधवरावांस परवानगी देऊन वाड्याच्या साफसुफीची व देखरे-खीची कामगिरी त्यांचेवर सोंपविली होती. त्यामुळें स्वतःचें घर भाड्यानें देऊन त्यांना दरमहा जें भाडें मिळे तीच त्यांना अप्रत्यक्ष मदत मिळत असे. शिवाय कै. श्रीमंत बापुसाहेब बुटींनीहि बाबांचे प्रिय भक्त या नात्यानें त्यांनी बांधिलेल्या समाधिमंदिराच्या सर्व भागांची साफ सफाई व देखरेख करण्याची कामगिरी सोपविली होती, याबद्दल माधवरावांना दरमहा सात रुपये मिळत असत. पुढें बापुसाहेबांच्या चिरंजिवानीं माधवरावांच्या निधनापर्यंत ही व्यवस्था चालविली होती.

**माधवरावांचा अंत**— शिरडी संस्थान कमिटीची स्थापना शके १८४४–४५ सालीं अगर त्या सुमारास झाली.

(पान ४६ वर पहा)



● केरसुणी स्वतः अपवित्र असली तरी जी जागा ती झाडते त्या जागेला ती पवित्रच करीत असते. म्हणूनच नवी केरसुणी घेतांना तिला हळदकुंकू वाहून तिची पूजा करतात. केरसुणीला पाय लावूं नये असें म्हणतात तें त्याच अर्थानें.

( पान ४५ वरून )

तेव्हांपासून माधवराव हे श्री दासगणू महाराजाप्रमाणें त्या कमिटीचे आजीव सन्मान्य सभासद होते. पण कांहीं गैरसमजामुळें माधवरावांचें निधनापूर्वी अवघे ४।६ महिने माधवरावांनीं दोन महिन्यांत दीक्षीताचा वाडा खालीं करावा म्हणून कमिटीनें ठराव पास केला; त्या प्रमाणें वाड्यांतील आपली जागा खालीं करून माधवराव हे आपल्या स्वतःच्या घरीं राहण्यास गेले. तेथें कोणत्याहि तऱ्हेचे कष्ट न सोसावे लागतां फक्त अहोरात्र व दुसरे दिवशीं बारा वाजेपर्यंत बेशुद्ध स्थितींत राहून त्यांनीं गुरुवार दिनांक १६ एप्रिल सन १९४० या पुण्य दिवशीं रात्रीं श्री साई सद्गुरू माऊलीचे दिव्य चरणीं आपला देह ठेवला. अशा तऱ्हेचा मृत्यु क्वचित्‌च कोणास लाभत असेल. पूर्व सुकृतावांचून व पूर्ण गुरुकृपेवांचून असा मृत्यु लाभणें कठीण. अंतकाळीं त्यांचे वय ८० वर्षांचें होतें.

**माधवराव म्हणजे शिरडींतील एक अत्यंत उपयोगी आणि परोपकारी गृहस्थ :** श्री. बाबांच्या दर्शनास जे शेकडों किंवा हजारों भक्त शिरडीस येत असत, त्यापैकीं बहुतेकांना माधवरावांनीं कोणत्या ना कोणत्या प्रकारें मदत केलेली आहे. त्यापैकीं कांहीं निवडक उदाहरणें खालीं देत आहे.

( १ ) **उपासनी बाबा** (साकोरी) हे प्रथम जेव्हां शिरडीस आले तेव्हां त्यांची प्रकृति बरी नव्हती. झोंपेत त्यांना वाईट स्वप्नें पडून 'मी मेलों मी मेलों' असें ओरडून घाबरून उठत असत. त्यांनीं माधवरावांमार्फत श्री बाबांची याविषयीं विनंति केली; माधवरावांनीं जेव्हां हें श्री बाबांना सांगितलें तेव्हां बाबा म्हणाले, 'मारणकु नै, तारणकु ए जागा है' यानंतर उपासनीबाबांची भिती गेली आणि ते दीक्षित वाड्यांत आणि खंडोबाच्या देवळांत बरींच वर्षें राहून बाबांची कृपा संपादून शिरडी सोडून निघून गेले.

(इंग्रजी भक्तानुभव. माधवरावांचें कथन भाग २—पान १३० ).

( २ ) श्री. आण्णासाहेब दाभोळकर यांच्या मनांत असें आले कीं, ज्यांना प्रत्यक्ष बाबांचें दर्शन होऊन नयन निवाले नाहींत, त्यांचेकरितां बाबांच्या गोष्टी (लीला) गोळा कराव्या आणि त्यांचेकरितां त्या लिहून प्रसिद्ध कराव्या. ही आपल्या मनांतील वृत्ति त्यांनीं माधवरावांचें कानावर घातली. 'तेचवेळीं माधवरावांनीं । नाहीं तेथें दुसरें कोणी । ऐसाच प्रसंग साधुनी । बाबा लागुनीं पुसिलें ॥६६ बाबा हे अण्णासाहेब म्हणती । आपुलें चरित्र यथामति । लिहावें ऐसें येतें चित्तीं । आपुली अनुमति असलिया ॥ ६७॥ २ अ. (श्रीसाईसच्चरित) त्यावर बाबांनीं आपलें पूर्ण साहाय्य आहे असें सांगून सम्मति दिली, आणि त्याचें फल म्हणजे सर्व श्री साईभक्तांना आपल्या संप्रदायाचा आणि आवडीचा ग्रंथ **श्री साईसच्चरित** निर्माण झाला आणि त्या ग्रंथाचें अध्ययन आणि परिशीलन आज कित्येक वर्षें सर्व साईभक्त मोठ्या भक्तीनें आणि आवडीनें करीत आहेत.

( ३ ) श्री सिदीक फाळके हे कल्याणवासी एक श्रीमंत गृहस्थ मक्का—मदिना यात्रा करून बाबांचे दर्शनासाठीं शिरडीस

येऊन राहिले. पण नऊ महिने झाले तरी बाबांचें दर्शन नाहीं. पुढें कोणी त्यांस सांगितलें कीं, नंदीचें दर्शन घेतल्याशिवाय शंकर प्रसन्न होईल काय ? तेव्हां तुम्ही माधवरावांची कास धरा म्हणजे तुमच्या मनाची आस पुरेल. त्याप्रमाणें त्यानें केलें. तेव्हां माधवरावानें बाबांजवळ अति हळुवार गोष्ट काढिली. “ बाबा तो कष्टी फार। कराना उपकार तयावर ॥ हाजी तो करूनि मक्का–मदिना। शिरडीस आला आपुलें दर्शना ॥ ( श्री. साईसच्चरित. अ. ११–८७–८८ ) असंख्यात जन येऊन मशीदींत आपलें दर्शन घेतात आणि हाच खिचपत कां पडला ! ( अ. ११–८९ ) इत्यादि गोड व मधुर वाक्यांनीं बाबांची विनवणी करून शेवटीं फाळक्यास बाबांचें दर्शन आणि कृपा यांचा लाभ झाला.

( ४ ) **श्री. राधाबाई देशमुख :** खाशाबा देशमुखाची आई. राधाबाई देशमुख या वृद्ध बाईची श्रीसाईपायीं निष्ठा जडली आणि बाबांचे दर्शन घेतलें. तेव्हां त्यांच्या पायीं तिचा अनुराग जडला आणि तिनें संकल्प केला कीं, श्रीसाई हे आपले गुरु आणि त्यांनीं आपणास एखादा कानमंत्र द्यावा. असा दृढनिश्चय करून, खाणें पिणें बंद करून धरणें घेऊन ती बसली. या प्रमाणें तीन अहोरात्र गेल्यावर तिची स्थिति पाहून माधवरावांस भीति पडली आणि त्यांनीं तिची बाबांपाशीं मध्यस्थी केली आणि त्यानंतर बाबांनी तिला बोलावून आणून आणि प्रेमळपणें ‘ आई तूं कां गे घेतलें धरणें ’ अशी हांक मारून तिची समजूत घातली. हा सर्व विस्तृत व गोड कथाभाग श्री साईसच्चरित अध्याय १८ व १९ यांत पहावा.

(५) अहमदनगरचे श्री. **दामु अण्णा कासार** हे एक दोन मोठे सट्टयाचे व्यापार करून लाख दोन लाख रुपये गमावून बसणार बसणार होते. पण माधवरावाच्यामुळें त्यांतून ते बचावले आणि बाबांच्या कृपेस पात्र झाले. याविषयीं मनोरंजक कथा, श्रीसाईसच्चरित अध्याय २५ यांत वाचावी.

(६) जिल्हा नाशीक ग्रामवणी येथील सप्तशृंगी देवीचे उपासक श्री. **काकाजी वैद्य** यांना, ‘ तूं बाबापाशीं जाईं। मन होईल सुस्थिर। ( अ. ३०–३४ ) असा सप्तशृंगीदेवीचा स्वप्नदृष्टान्त झाला होता. याला बाबांची भेट आणि दर्शन माधवरावांनीं कसें करवून दिलें ही कथा श्रीसाईसच्चरित्र अध्याय ३० यांत वाचावी.

(७) एकदां माधवरावांचे कनिष्ठ बंधु बापाजी यांच्या बायकोला ग्रंथिज्वर येऊन जांघेवर ग्रंथि उठल्या होत्या. त्यावेळीं माधवरावांनीं बाबाची करुणा भाकून आशिर्वादासहित उदी मिळवून ती रोग्याला देऊन केस बरी केली आणि आपल्या बंधूचें संकटहरण केलें ही कथा श्रीसाईसच्चरित अध्याय ३४ यांत पहावी.

(८) सोलापुरीं राहणारे **सखाराम औरंगाबादकर** यांचे पत्नीस सत्तावीस वर्षें मूल नव्हते. आपला सापत्न पुत्र बरोबर घेऊन ती शिरडीस आली आणि दोन महिने बाबांची सेवा करीत राहिली. आपली पुत्रेच्छा बाबांचे कानावर घालावी अशीं तिनें माधवरावांची विनवणी केली. माधवरावांनें तिला सांगितले कीं, ‘ प्रयत्न करणें माझें काम ! यशदाता मंगलधाम ’ ॥

(अ. ३६-१३२), तूं नारळ आणि उदबत्ती घेऊन दगडावरती सभामंडपीं बैस. नंतर बाबा खुषींत आहेत अशी संधि पाहून, नारळ बाबाचे हातांत देऊन बाबांच्या चरणावर मस्तक ठेवण्यास त्या बाईस खुणाविलें. त्या बाईनें तसें केलें. तेव्हां माधवराव म्हणाले,–'देवा, घाल हा नारळ तिच्या ओटींत आणि तुला पुत्र होईल असा आशीर्वाद तिला दे.' बाबा म्हणाले–' आपण नाहीं बुवा घालीत तिच्या ओटींत नारळ. अशा नारळानें कुठें पोरें होतात कां रे श्यामा?' नंतर पुढें बरीच हुज्जत घालून बाबांकडून तो नारळ माधवरावानीं त्या बाईचे ओटींत घालून दिला. आणि पुत्रप्राप्तीचा आशीर्वादहि देवविला. बाबा 'म्हणती होईल जारे पोर। शामा म्हणे कधीं दे उत्तर॥ वदतां बारा महिन्यानंतर। नारळ ताडकन फोडिला॥ १५४॥ अर्धभाग दोघीं सेविला। अर्ध राहिला बाईतें दिधला॥ माधवराव वदे बाईला। माझिया बोला तूं साक्षी॥ १६५॥ बाई तुज आज पासून। बारा महिने नव्हतां पूर्ण॥ जाहलें नाहीं पोटीं संतान। काय मी करीन ते परिस॥ १५६॥ ऐसाच नारळ डोक्रींत घालून। या देवाला मशीदींमधून॥ मी न जरी लावी काढून। तरी न म्हणवीन माधव॥ १५७॥ बाबा हांसून शांतपणें म्हणाले–' जाय जाय श्याम्या, पोर होईल होईल जाय' पुढें त्याप्रमाणें त्या–बाईला वर्षाचे आंत मुलगा झाला व तिनें तावडतोब पतिसह शिरडीस येऊन त्याला बाबांचे पायांवर घातलें. 'पतीनें ही आनंदोनी। साईसमर्थ चरण वंदोनी। पायीं पंचशत रुपये अर्पुनी। कृतज्ञ निज मनीं झाला'॥ अ. ३६-१६५॥ बाबांचा वारु शामकर्ण। तयाचें सांप्रत वसतिस्थान॥ तयाच्या भिंती घेतल्या बांधून। रुपये लावून हेच पुढें॥१६६॥ ही गोड, मधुर, मनोरंजक कथा मुळांतून श्रीसाई सच्चरित्र अध्याय ३६ येथें अवश्य वाचावी.

देवभक्तांमध्यें किंवा गुरु शिष्यांमध्यें असें शुद्ध, निर्व्याज व निष्कलंक प्रेम, इतका भरवंसा किंवा विश्वास आणि इतकी कमालीची सलगी इतरत्र क्वचित् पहावयास किंवा वाचावयास मिळेल.

(९) प्रोफेसर **ग. गो. नरके,** एम्. ए. एम्. एस्. सी. हे श्री. बापुसाहेब बुटी यांचे जामात. हे माधवरावांविषयीं असें सांगतात कीं, "श्रीबाबा माधवरावांपाशीं बोलत असत तसें इतरांशीं बोलतांना दिसले नाहींत, हें मला प्रथम दिवसापासून दिसून आलें. श्रीबाबांना नक्की कांहीं विचारावयाचें झाल्यास मी तें माधवमार्फतच विचारीत असें. माझे-: प्रमाणें इतर भक्तहि श्रीबाबांसमोर आपली विनंति, माधवरावांचेच मार्फत मांडीत असत. माझे संबंधानें एकदां असें झालें कीं, माझ्या नोकरीचा प्रश्न निघाला. माधवराव हजर नव्हते म्हणून डॉ. पिल्लेचे मार्फत बोलणें केलें. तात्पुरता ब्रह्मदेशाचे नोकरीचा प्रसंग होता. बाबा म्हणाले,–ब्रह्मदेशांत जावें, तो आपलाच देश आहे! डॉ. पिल्लेनीं विचारलें कीं, ब्रह्मदेशाची नोकरी चांगली आहे ना, हें तेथें कायम होतील ना? बाबा म्हणाले, 'होय.' पण या पूर्वीच बाबानीं मी पुण्यास कायम होईन असें सांगून ठेविलें होतें. बिऱ्हाडीं परत आल्यावर माधव-

रावजींना व इतर मंडळींना ही हकीकत सांगितली. सर्वांना थोडें आश्चर्य वाटलें. माधवरावजी मला बाबाकडे पुन्हां घेऊन गेले. त्यावेळीं डॉ. पिल्ले तेथें बसले होते. माधवराव म्हणाले— "काय रे देवा, कोणतें खरें, तूं मला सांगितलेलें खरें कीं भाऊला (डॉ. पिल्लेना)? सांगितलेलें खरें. डॉ. पिल्लेनी पुन्हां हंसत हंसत, कोणतें खरें असें विचारतां बाबा म्हणाले कीं—शाम्याला सांगितलेलें खरें. आणि पुढें तसें घडून आलें. श्री. प्रोफेसर नरके यांची नेमणूक पुणें इंजीनियरिंग कॉलेजांत कायमची झाली आणि त्यांनीं तेथें बरीच वर्षे काम केलें.

(१०) **'जया मनीं जैसा भाव। तया तैसा अनुभव.'** श्री. रा. आ. तर्खड, माजी संपादक, श्रीसाईलीला हे श्रीसाईलीलेच्या सहाव्या वर्षाच्या अंकांत (पान २७–२९) ता. २२।९।१९२९ ला लिहितात कीं, माधवराव देशपांडे यांनीं मला स्वतः अनुभवलेली गोष्ट सांगितली ती अशी कीं, "सुमारें १४–१५ वर्षांपूर्वी एका श्री रामनवमीच्या उत्सवाला, शिरडी येथें बेसुमार यात्रेकरू आले होते. साठ पांसष्ट हजारांवर यात्रा जमली होती. यावेळीं मशीदीच्या आवारांत आणि बाहेर माणसांची रेटारेट चालली होती. उन्हांमुळें अंगांतून घामाच्या धारा चालल्या होत्या, तरी यात्रेकरूंचा उत्साह अपूर्व होता आणि प्रत्येक इसमाची दर्शनासाठीं घडपड चालली होती. अशावेळीं मराठमोळ्याची पांसष्ट–सत्तर वर्षांची, वार्धक्यानें कृश झालेली एक म्हातारी बाई गर्दीत आक्रोश करीत होती—'अरे मज म्हातारीवर दया करा, बाबा तुझें दर्शन देरे!' इतक्यांत त्या गर्दीतून मी देवाच्या सेवेसाठीं चाललों होतों. त्या म्हातारीची करूणाजनक हांक ऐकून माझ्या मनांत देवाच्या प्रेरणेनें दया उत्पन्न झाली आणि मी त्या म्हातारीचा हात पकडला आणि म्हटलें, चल बये

(पान ५० पहा)



- जहाज वाटेल त्या दिशेला जात असे ना का, होकायंत्राचा कांटा असतो उत्तर दिशेलाच. त्यामुळें जहाजाची दिशाभूल होत नाहीं. तसेंच माणसाचें मनहि जर ईश्वराकडे गुंतून राहिलें तर मग त्याला कसलेंच भय राहणार नाहीं.

माझेबरोबर, मी तुला देवाचें दर्शन घडवितों. त्या म्हातारीला जो आनंद झाला तो मी अद्याप विसरलों नाहीं. पोलीस व इतर लोक मला ओळखत असल्यामुळें त्या भयंकर गर्दीतून आम्हीं कसेबसे देवाजवळ जाऊन पोहोंचलों. लगेच त्या म्हातारीनें आरोळी मारून देवांच्या कमरेला घट्ट मिठी मारली. तिच्या डोळ्यांतून अश्रूंचें पूर वाहूं लागले. कांहीं वेळेपर्यंत तिच्यानें कांहीं बोलवेना. देवानें तिचें माथें आणि पाठ कुरवाळून तिला घरच्या कांहीं गोष्टी विचारल्या आणि म्हटलें—आये, मी तुसी कधीपासून वाट बघतुं ग! तूं मला खायाला काय आणलंस? म्हातारीनें म्हटलें, बाबा मी एक भाकर आणि दोन कांदे आणले. वाट चालून थकल्यावर ओढ्यावर बसून अर्धी भाकर नि एक कांदा म्यां खाल्ला आणि मज पाशीं अर्धी भाकर आणि कांदा आहे तो तूं खा! असें म्हणून पदरांत बांधलेली भाकर आणि कांदा देवाला दिला. देवानें ते पदार्थ तेथल्या तेथेंच खाल्ले आणि म्हटलें— आये, तुझी भाकर मला लयि गोड लागली ग! हा प्रकार पाहून मला आनंदाचें भरतें आलें आणि मी मनांत म्हटलें काय ही देवाची लीला! त्या म्हातारीला आपण कृतार्थ झालों असें वाटलें. तिनें देवाचा प्रसाद आणि उदी घेतली आणि ती तेथून पोलिसांच्या मदतीनें सुखरूप परत गेली.

माधवराव म्हणाले— बाबासाहेब, ही गोष्ट मी कधींहि विसरणार नाहीं. मी मनांत गांठ मारली कीं— "**जया मनीं जैसा भाव, तया तैसा अनुभव**" या बाबाच्या आरतींतील एका कडव्यांतील वाक्याप्रमाणें ही गोष्ट घडली आहे.

शेवटीं ऐवढेंच सांगावयाचें कीं, तेव्हांच नव्हे तर आणि आतांहि "**जया मनीं जैसा भाव। तया तैसा अनुभव**" असे अनुभव अनेक भक्तांना येत आहेतच आणि ते वेळोवेळीं श्री साई लीलेमध्यें प्रसिद्धहि होत आहेत.

**धन्य त्या बाबांची आणि त्यांच्या शाम्याची!**

---


॥ श्री साईनाथ प्रसन्न ॥

# भास्कर लक्ष्मण नार्वेकर

नवीन फॅशनप्रमाणें, सोन्या—चांदीचे, कल्चर मोत्यांचे दागिने तयार मिळतील व ऑर्डरप्रमाणें तयार करून दिले जातील, तसेंच श्री. साईबाबांचीं सोनें—चांदीचीं लॉकेटस् व चांदीचे तयार फोटो मिळतील. एक वेळ भेट देऊन खात्री करा. सुंदर फॅशनेबल दागिने तयार करून घ्या.

१८४, ठाकुरद्वार रोड, मुंबई २.

(पान ३२ वरून)

आहे तें ग्रंथकर्ते श्री. अनंतराव आठवले यांनीं मोठ्या सहृदयपणें विशद केलें आहे.

**व्यक्तिदर्शन आणि वाङ्मयदर्शन**

या ग्रंथाचे दोन मुख्य भाग आहेत. नांवांतच ते आहेत. पहिला भाग व्यक्ति-दर्शन, दुसरा भाग वाङ्मयदर्शन. शेवटीं दासगणूंच्या काव्यांतील वेंचक उतारे जोडले आहेत. मीं हा ग्रंथ इत्थंभूत वाचला. वाचीत चाललों तसा त्यांत रमून गेलों. यावरूनच अनंतरावांची भाषा आणि मांडणी किती मनोहर आणि आकर्षक आहे याची ग्वाही मी येथें प्रसन्नपणें देऊं शकतों. या अभिप्रायाचा प्रत्यय कोणाहि वाचकास आल्याशिवाय राहणार नाहीं.

'वयं तु न वितृप्याम स्वादु स्वादु पदे पदे।'

या भागवतवाक्याचें स्मरण हा ग्रंथ वाचतांना हटकून होईल.

परमार्थ श्रेष्ठ वाटला तरी 'जयाचें ऐहिक घड नाहीं तयाचा परार्थ पुसशी काई' या ज्ञानेश्वरमहाराजांच्या उक्तीप्रमाणें ऐहिकांविषयींची आस्था आमच्या संत-कवींनीं मोडून काढिली नाहीं. दासगणूंचें राष्ट्रप्रेम किती जळजळीत, जागृत आणि जिव्हाळ्याचें आहे याचींहि उदाहरणें त्यांच्या काव्यसंभारांत अनंतरावांनीं जाग-जागीं विपुल प्रमाणांत दाखल केलीं आहेत, तीं वाचकांनीं अवश्य पाहावीं. जुना आचार न मोडतां, जुन्यांतील उदारपणा वाढीस लावण्याची थोर दृष्टि दासगणूंच्या मनांत व कवनांत कशी भिनली आहे, याचें दर्शन त्यांच्या काव्य-परिशीलनानें होतें. तेंच श्री. अनंतरावांनीं मोठ्या ठळकपणें या ग्रंथांत दाखवून दिलें आहे.

सिंहगडच्या देवटाक्यांत वरून पाहिलें तर खालच्या तळचा तांदळाचा दाणाहि स्पष्ट दिसतो. तशी दासगणूंची वाणी आहे. अर्थ अगदीं स्पष्ट—स्वच्छ म्हणूनच

दृष्टींतील तेज म्हणजेच जीवनाच्या उत्कर्षातील प्रमुख अंग होय
म्हणून दिव्य दृष्टि देणाऱ्या स्वस्त आणि टिकाऊ चष्म्याला प्रमुख स्थान मिळतें.



त्याकरितां—
शिसा ऑप्टिशिअन्स
(चष्म्यांचे व्यापारी)
हें एक नांवाजलेलें दुकान आहे.
यांच्या येथें डोळ्यांच्या तज्ज्ञ डॉक्टरांकडून डोळे मोफत तपासले जातात.
छबीलदास रोड, दादर (W. R.), मुंबई २८.

अशा वाणीला प्रासादिक म्हणतात. श्रीभगवंताची कृपा तीवर आहे; या अर्थानेंहि तिला प्रासादिक म्हणणें शोभण्यासारखें आहे. श्री. अनंतरावांनीं एके जागीं सहज सांगितलें आहे कीं महाराज कविता बोलत जातात, लिहिणारा टिकत नाहीं! एकदां लय लागली कीं प्रवाह सुरूं! हा गुण नसता तर लाख पाऊणलाख कविता रचून होतीच ना. याला आंगचा गुणच लागतो. त्याच्याहि खुणा बाळपणीं उमटलेल्या ग्रथांत नमूद केल्या आहेत.

श्रीदासगणूमहाराज संतकवि आहेतच पण महिपतीनंतर एकमेव संतचरित्रकार आहेत. महिपतीच्या नंतरच्या काळीं जे संतमहंत होऊन गेले किंवा दासगणूंच्या काळीं हयात होते, त्यांचीं चरित्रें लिहावीं हा दागणूंचा मुख्य छंद! त्यासाठीं त्यांनीं खूप परिभ्रमण केलें, सर्व स्थळें पाहिलीं, त्यांच्या भक्तांकडून विश्वसनीय वाटणारी माहिती गोळा केली आणि नंतर आपल्या काव्यप्रतिभेनें ती खुलवून त्यांच्या चरित्रांतील मर्म स्वतःच्या अपूर्व कौशल्यानें आविष्कृत केलें! ही कामगिरी इतकी अपूर्व आहे कीं गेल्या शतकांतील संतांचीं चरित्रें समजण्यास एवढें विस्तृत व एकच असें साधन आहे. महाराष्ट्राच्या इतिहासकारालाहि श्रीदासगणूंचें हे चरित्र-ग्रंथ साहाय्यभूत झाल्याविना राहणार नाहींत.

चि. अनंतराव यांनीं या ग्रंथाच्या दुसऱ्या भागांत संतकवीच्या कवित्वाची एक मीमांसा आपल्या मतानें केली आहे. ही मीमांसा मार्मिक आणि विचारणीय वठली आहे. तात्त्विक वाद सोडला तर दासगणूंच्या रचनेंत केवळ काव्यरसिकांनाहि रंजवील असा भाग पुष्कळ आहे हें दिसून आल्याखेरीज रहाणार नाहीं. एवढें खरें, कीं त्यांची जी रचना कीर्तनासाठीं झाली ती वाचण्यापेक्षांहि उठावदार म्हणण्यानेंच तिचा प्रभाव पडतो. आणि तिचें रसोत्पत्तिसामर्थ्य अनुभवास येतें. श्रोत्यांच्या डोळ्यांतून आपोआप जो अश्रुप्रवाह वाहूं लागला तोच त्या म्हणण्याची साक्ष पुरवील. श्रीदासगणू यांच्यासारख्या आधुनिक संतकवींची भक्तिरसांत रंगून गेलेली वाणी जेव्हां श्रोत्यांनाहि रंगवून टाकते, तेव्हां त्या वाणींतली काव्यशक्ति निराळी वर्णन करून दाखवून द्यावी लागत नाहीं. थोर कवींच्या पंक्तींत दासगणू यांना मानाचें पान द्यावें लागेल आणि सर्व समंजस रसिक तें तसें देतील याविषयीं मला कसलीहि शंका नाहीं.

---



● आंबा पिकला कीं आपोआप डहाळीवरून गळून पडतो, तद्वत्‌च ज्ञानलाभ होतांच आत्माभिमान वगैरे आपोआप गळून जातात!

"देवाच्या सख्यत्वासाठीं— पडाव्या जिवलगांच्या तुटी" असें केव्हां घडतें?

# संकल्प आणि सिद्धी

लेखक : **पु. बा. कुळकर्णी**

एखाद्या कार्यात यश मिळालें नाहीं म्हणजे आमची कुरकुर सुरू होते; परंतु यश कां मिळालें नाहीं याचा मात्र कोणी विचार करीत नाहीं. सर्वस्व पणाला लावून, त्या कार्यात आपलें अंतःकरण ओतून जर तुम्हीं उद्योगास लागलां तर यश तुमच्यापसून केव्हांही दूर पळणार नाहीं.

एखाद्या ठिकाणीं तुम्हांला व्याख्यानाचें आमंत्रण असतें. तुमचें व्याख्यान ऐकण्यासाठीं श्रोतृसमाज मोठ्या प्रमाणांत आतुरतेनें आलेला असतो. तुम्हीं मात्र केवळ वेळ मार मारून नेण्यासाठीं तेथें जातां आणि पूर्वतयारीच्या किंवा कांहीं ना कांहीं विचार करण्याच्या अभावीं तोंडास येईल तें बोलून एकदांचे मोकळे होता.

असल्या भाषणांचा श्रोत्यांवर काय बरें परिणाम होणार? उगाच वेळ खर्च करून आल्याबद्दल श्रोते चडफडत निघून जातात. मागाहून ही परिस्थिति तुमच्या लक्षांत येते; परंतु वेळ निघून गेलेली असते. त्यामुळें पश्चात् बुद्धीचा कांहीं एक उपयोग नसतो. तेंच जर सारी बुद्धिमत्ता खर्च करून व शक्य ती साधनसामुग्री जवळ करून तुम्हीं तुमच्या भाषणांत सर्वस्व ओतण्याचा प्रयत्न केला असता तर तुमचें व्याख्यान परिणामकारक व श्रोतृवृंदाकडून धन्योद्गार वदविणारें झाल्याशिवाय राहिलें नसतें.

हाच नियम प्रत्येक बाबतींत लावून पहाण्यासारखा आहे. जें काम हातीं घ्याल त्याच्या प्राप्तीसाठीं मनोभावें झटा, त्यासाठीं तन, मन, धन जें कांहीं जवळ असेल तें खर्च करा, त्यांत सर्वस्व ओता, एकतानतेनें व संपूर्ण श्रद्धेनें त्याच एकमेव कार्याच्या मागें लागा आणि मग पहा जादूची कांडी फिरविल्या प्रमाणें काय चमत्कार घडून येतो तो!

सर्वस्व अर्पण करणें, सारा उत्साह, सारी बुद्धिमत्ता खर्ची घालणें, हेंच यशाचें साधन आहे.

देव कोणाला पावतो? ज्याची सर्वस्व अर्पण करण्याची तयारी आहे त्याला. तुमच्यांत जें जें सर्वोत्कृष्ट व ठेवणींतलें म्हणून असेल तें सदा सर्वकाळ निःसंकोचपणें अर्पण करण्याची तुमची तयारी असली पाहिजे. म्हणजे मग जिकडेतिकडे यशाचे बावटे फडकत असलेले तुम्हांला दिसून येतील. अर्धवट प्रयत्न, अर्धवट श्रद्धा व अर्धवट चिकाटी कांहीं कामाची नाहीं. त्यामुळें अर्धवट यश तुमच्या पदरांत पडेल. आणि अर्धवट यशाला या जगांत कांहींच किंमत नाहीं. तें संपूर्ण असलें तरच त्याचें महत्त्व व तेंच यश अभिनंदनीय ठरतें.

या जीवनांत तुम्हांला नाना प्रकारच्या उद्योगांची कास धरावी लागते. कधीं यश तर कधीं अपयश असा हा पाठशिवणीचा खेळ अखंड चाललेला असतो. अपयशाचा भागीदार व्हावें लागलें तर त्याचा दोष स्वतःवर न घेतां हीं नाहीं तर तीं कारणें पुढें करून इतरांचें व कदाचित् स्वतःचेंही समाधान करण्याचा प्रयत्न करून आपण मोकळे होतों. तुम्हीं विचारी असाल तर अशा रीतीनें तुम्हीं स्वतःची फसवणूक करून घेणार नाहीं. थोड्याशा विचारांनीं तुम्हांला आढळून येईल कीं, अपयशाचें कारण तुमचे तुम्हींच असतां, तुम्हीं पुरेसे प्रयत्न केलेले नसतात; सर्वस्व पणास लावून तुम्हीं त्या कार्याचा पिच्छा पुरविलेला नसतो. म्हणजे दोष तुमचाच असतो.

"छे हो, काय करणार? फार जड आहे तें काम!" असा निर्वाळा देऊन कार्यभाग होत नसतो किंवा तुम्हीं त्यामुळें दोषमुक्त होऊं शकत नाहीं. जड आणि कठीण! असें म्हणून कोणत्याही कामापासून दूर पलायन करणें फार सोपें असतें. परंतु त्याच कामाला मगरमिठी घालून त्याचा सोक्षमोक्ष लावून घेण्यासाटीं झटणें यांतच खरा पुरुषार्थ आहे.

तुम्हांला यशाचा धनी व्हायचे आहे ना? मग जड आणि कठीण या शब्दांचा नुसता जप करीत बसल्यानें काय होणार आहे? जडतेचे आणि कठीणतेचे डोंगर फोडून तुम्हीं घाटांतील आपला मार्ग निष्कंटक व साफ मोकळा करून घेतलाच पाहिजे. हें करीत असतां दगड, धोंडे व माती यांचा मधून मधून तुमच्यावर अनकल्पित वर्षाव होईल; तो शीरोधार्य करण्यांतच यशाचें व पुरुषार्थाचें मर्म सांठविलेलें आहे.

परंतु केव्हांही हा मार्ग अडचणींचा आहे, तो खांचखळग्यांनीं भरलेला आहे या सबबीवर तुम्हीं पलायन वादाचा अवलंब करतां कामा नये. पुरुषार्थ हा अडचणींशीं झगडून, संकटांस टक्कर देऊन स्वतःचा मार्ग मोकळा करून घेण्यांत आहे.

हातीं घेतलेलें कार्य मग तें कोणत्याही स्वरूपाचें असो त्यांत सारें अंतःकरण ओतण्याची व सर्वस्व पणास लावण्याची कला जो हस्तगत करून घेईल तोच या जगांत यशाचा धनी होईल, याची प्रत्येकानें खूणगांठ बांधून ठेवावी.

एकच उदाहरण घेऊं या. तुम्हांला एक भला मोठा ग्रंथ लिहून पूर्ण करावयाचा आहे; किंवा समजा, एखादा पहाड चढून जावयाचा आहे. कसें होईल, काय होईल, याची विवंचना करीत बसल्यानें का हा तुमचा ग्रंथ पूर्ण होणार आहे कां त्या पहाडाचे शिखर तुम्हांला गांठता येणार आहे? शक्तिसर्वस्व वेचून निर्धारपूर्वक तुम्ही त्या कार्याला लागले पाहिजे, त्याला वाहून घेतलें पाहिजे, वाढत्या उत्साहानें रोजच्या रोज तें करायला लागलें पाहिजे, त्यासाठीं उत्साहपूर्वक जिवाचें रान केलें पाहिजे. असें कराल तेव्हांच अपेक्षित स्वर्ग तुमच्या हातीं येईल, एरव्हीं नाहीं.

पहा ना एवढें करून! मग परमेश्वर एकदांचा पावला असें कृतकृत्यतेचे सहजोद्गार तुमच्या तोंडून बाहेर पडतील. 'देवाचिया भेटीसाठीं। पडाव्या जिवलगांच्या तुटी॥'. असें म्हटलें आहे, तें उगाच काय!

# भगवान् बुद्धाचें बोधामृत

भगवान् बुद्धांची असंख्य बोधवचनें पाली भाषेंतील ग्रंथांतून विखुरलेलीं आहेत. दिघनिकाय ह्या ग्रंथांत जीं चौतीस सूत्रें आहेत, त्यांपैकीं 'सिगालसुत्त' नांवाच्या सूत्रांत गौतमबुद्धांचीं अनेक बोधवचनें आहेत. त्यांतील कांहीं नित्योपयोगी बोधवचनें खालीं दिलीं आहेत.

● द्वेष, मोह किंवा भय यांमुळें जो धर्माचरण सोडतो त्याच्या यशाचा नाश होतो. याच्या उलट, जो कोणी द्वेष, मोह किंवा भय यांमुळें धर्माचरण कधींहि सोडीत नाहीं, त्याचें यश सारखें वाढत असतें.

● मद्यादि मादक पदार्थांचें सेवन करूं नये. कारण त्यामुळें संपत्तीचा नाश होतो, रोग उद्भवतात, कलह माजतात, अपकीर्ति होते, बुद्धीचा नाश होतो आणि मनुष्य निर्लज्ज बनतो.

● अवेळीं बाहेर भटकूं नये. जो माणूस अवेळीं बाहेर भटकूं लागतो तो स्वतःचें संरक्षण करायला असमर्थ असतोच, शिवाय त्याच्या हातून त्याच्या बायकोचें व मुलाबाळांचेंहि नीट संरक्षण होत नाहीं. संपत्तीचा नाश होतो व तो आपल्यावर अनेक वेळां संकटें ओढवून घेतो.

● नाटकतमाशांचें व्यसन लावून घेऊं नये. ज्याला तसलें व्यसन लागतें तो दुसम नेहमीं नाचगाण्यांच्या कार्यक्रमांतच दंग होतो व त्यामुळें त्याच्या हातून गृहकृत्यें नीट रीतीनें पार पडत नाहींत. गृहकृत्यें करायला त्याला वेळच मिळत नाहीं.

● जुगार खेळूं नये. जुगारांत पैसा मिळाला तर त्यामुळें वैर निर्माण होतें, आणि पैसा गेला तर शोक पदरांत पडतो!

● वाईट मित्रांची संगत करूं नये. पापमित्रांची संगत असली तर दारुडे, चोर, जुगारी यांचीहि पुढें मैत्री होते व तसले मित्र नाशाला कारणीभूत होतात.

● सतत उद्योग करीत राहावें. फार थंडी, फार उन्हाळा किंवा तसलींच कांहीं क्षुल्लक कारणें शोधून जो आपला उद्योग सोडतो आणि आळसांत वेळ घालवतो त्याला त्याची संपत्ती सोडून जाते. तो दरिद्री होतो.

● कांहीं ना कांहीं स्वार्थ मनांत बाळगून घरीं येणारा व कांहीं ना कांहीं घेऊन जाणारा, केवळ शाब्दिक उपकार करणारा, हांजी हांजी करणारा, आणि पापकर्मं करण्यासाठीं साहाय्य करणारा हे आपले हितशत्रू आहेत असें समजावें.

● उपकार करणारा, सुखानें सुखी व दुःखानें दुःखी होणारा, सदुपदेश करणारा आणि आपल्यावर प्रेम करणारा, हे आपले खरे मित्र आहेत असें समजावें.

● आईबापांनीं सांगितलेलीं कामें करणें, त्यांचें पालनपोषण करणें,

त्यांच्या आज्ञेप्रमाणें वागणें, मृत माता-पित्यांच्या स्मरणार्थ दानधर्म करणें ही मातृपितृपूजा होय.

● गुरु आले असतांना उठून उभें राहाणें, ते आजारी असले तर त्यांची सेवाशुश्रूषा करणें, ते शिकवतील ते श्रद्धापूर्वक शिकणें, इत्यादि गोष्टींनीं गुरुपूजा होते.

● पत्नीला मान देणें, तिचा अपमान न करणें, अन्य स्त्रीशीं संबंध न ठेवणें, घरचा कारभार तिच्याकडेच सोंपविणें व वस्त्रालंकार पुरवून तिला खूष ठेवणें ही पत्निपूजा आहे.

● घरांत चांगली व्यवस्था ठेवणें, नोकराचाकरांना प्रेमानें वागवणें, पतीशीं एकनिष्ठपणें असणें, काटकसरीनें वागून संपत्तीचें रक्षण करणें, गृहकृत्यांत दक्ष असणें हीं स्त्रियांचीं कर्तव्यें होती. तीं करून स्त्रियांना पतिपूजेचें पुण्य पदरीं पाडून घेतां येतें.

● मित्रांशीं गोड बोलणें, त्यांना देतां येण्यासारख्या वस्तू असल्यास देणें, त्यांचे कांहीं काम आपल्याकडून होण्यासारखें असल्यास करणें, आपल्याप्रमाणेंच त्यांना लेखण्याची समानवृत्ति ठेवणें, आणि त्यांच्याशीं निष्कपट वर्तन ठेवणें ही आप्तमित्रांची पूजा होय.

● नोकरांचें सामर्थ्य बघून त्याप्रमाणेंच त्यांना कामें सांगणें, केलेल्या कामाबद्दल योग्य वेतन देणें, ते आजारी पडल्यास औषधोपचार करून त्यांची शुश्रषा करणें, त्यांना उत्तम अन्नवस्त्र देणें, चांगल्या सेवेबद्दल बक्षिस देणें, इत्यादि गोष्टींनीं सेवकांचीं पूजा होते.

● धन्यानें उठण्यापूर्वीं आपण उठणें, धनी झोपल्यानंतर झोंपणें, धान्याच्या मालाची चोरी न करणें, आपलें काम चोख करणें, धान्याची कीर्ति वाढविणें हीं सेवकांचीं कर्तव्यें आहेत.

● देहानें, वाचेनें व मनानें साधुसंतांचा आदरसत्कार करणें, त्यांना कांहीं हवें असल्यास देणें, त्यांचा सदुपदेश ऐकणें व त्याप्रमाणें वागणें इत्यादि गोष्टींनीं साधुसंतांची पूजा घडते.

---


# कै. पंडित मोतीलालजींचा दुसऱ्याच्या 'चष्म्यांतून' पहाण्यास नकार

ब्रिटिश अमदानींतील असेंब्लींत स्वराज्य पक्ष ह्या विरोधी पक्षाचे कै. मोतीलालजी पक्षप्रमुख होते. एकदां पंडितजी चष्मा आणण्यास विसरले असतां एका युरोपियन एक्झिक्युटिव्ह कौन्सिलरनें आपला चष्मा पुढें केला. हजरजबाबी पंडितजी तत्काळ म्हणाले, "माफ करा, मी आपल्या चष्म्यानें (दृष्टीनें) पाहूं शकत नाहीं."

दुसऱ्याच्या चष्म्यानें (दृष्टीनें) पहाणें सदोष आहे. सबब दूरदृष्टि ठेवून निर्दोष चष्म्यासाठीं भेटा.

**शेंडे आणि कंपनी, चष्म्याचे व्यापारी,** बोरभाट लेन, गिरगांव, मुंबई ४.

● दानधर्म करणें, अर्थचर्या म्हणजे दुसऱ्यांच्या उपयोगी पडणें, आणि आपपरभाव न ठेवतां दुसऱ्याला आपणाप्रमाणेंच लेखणें हीं लोकसंग्रहाचीं साधनें आहेत.

● हें जग शाश्वत आहे कीं अशाश्वत आहे, जगाचा अंत होणार कीं नाहीं, शरीर आणि जीव हे एक आहेत कीं वेगवेगळे आहेत, प्राणी मेल्यावर पुन्हां उत्पन्न होतो कीं नाहीं, इत्यादि प्रश्न सोडवींत बसणें खुळेपणाचें आहे. त्यामुळें प्रज्ञाप्राप्तीला अडथळा होतो. म्हणून प्रत्येकानें आधीं आपली प्रज्ञा पूर्णत्वाला न्यावी. कारण प्रज्ञेनेंच निर्वाणप्राप्ति होते.

● मूर्खांची संगत करूं नये, विद्वानांची मैत्री करावी, पूज्य व्यक्तींची पूजा करावी; म्हणजे त्यांना मान द्यावा.

● जें कृत्य केलें असतां लाभ आणि हानि, यश आणि अपयश, निंदा आणि स्तुति, सुख आणि दुःख ह्या आठ लोकस्वभावाशीं संबंध येऊनहि चित्त निर्विकार, निर्मळ आणि सुखरूप राहातें, तें कृत्य उत्तम समजावें.


● पापकर्मांपासून दूर असावें, सत्पुरुषांचा गौरव करावा, नम्रभावानें वागावें, कृतज्ञ व संतुष्ट असावें, आणि धर्मोपदेश ऐकावा.

● शीलाचें उत्तम रीतीनें पालन केलें पाहिजे.


● समाधि म्हणजे चित्ताची एकाग्रता करावी.

● जो क्षमाशील असतो, त्याला आरोग्य, आनंद, आयुष्य आणि सुख यांचा लाभ होतो.

भूत, भविष्य आणि वर्तमान धर्मतत्त्वें बोधिवृक्षाखालीं ज्यानें यथार्थ जाणलीं, अंतःकरणांत ज्ञेय तत्त्वांचा उदय होत असतां ज्याच्या बुद्धीवर मुळींच आवरण पडलें नाहीं, असा हा संबुद्ध भगवान् आमचें कल्याण करो !'



● पायांत कांटा रुतला तर प्रयत्नपूर्वक दुसरा एक कांटा आणून त्या कांट्यानें पायांतला कांटा काढतात. नंतर ते दोन्ही कांटे फेकून देतात. तसेंच प्रयत्नपूर्वक ज्ञान मिळवून अज्ञान दूर करावयाचें आणि मग ज्ञान आणि अज्ञान दोन्ही टाकून त्या पलीकडची सहजावस्था गांठायची. यालाच 'प्रज्ञा' म्हणतात.



# शिरडी वृत्त

## मार्च १९५६

या महिन्यांत, श्रीसाईदर्शनासाठीं नित्याप्रमाणें दररोज भक्तांची रीघ होंती. अनेक कलाकारांनीं शिर्डीस येऊन श्रींसमोर हजेरी दिली त्यांतील कांहीं कार्यक्रम पुढीलप्रमाणें—

**कीर्तन**—श्री. ह. भ. प. गोविंद गणेश भोसेकर, पंढरपूर. श्री. ह. भ. प. कृष्णाबाई येवलेकर सातारा. श्री. ह. भ. प. रामचंद्रबुवा पैठणकर रामदासी, नागपूर. तसेच संस्थान गवई श्री. मराठे यांची श्रीरामदासनवमी, महाशिवरात्र, श्री तुकारामबीज माधव ॥ ११ ॥ अशी ४ कीर्तनें या महिन्यांत झाली. श्री. वे. शा सं. नारायण हरी केळकर यांनी व श्री. नानासाहेब रासने (सं. स. ट्रस्टी) यांनी या महिन्यांत कीर्तनें केली.

**प्रवचनः**— श्री. वे. शा. सं. राजाभाऊ कस्तुरे, अकोला (वऱ्हाड) यांचे झालें.

**काव्यगायनः**— श्री. अनंत सखाराम शिंदे, कु. बिना अनंत शिंदे, चेंबूर, मुंबई.

**गायन—वादनः**— श्री. टी. एल. राजू, दादर, मुंबई. श्री. रामचंद्र आत्माराम केरकर, मुंबई तबला श्री. पिरोजबाई होमी, मुंबई. श्री. गुंडू तायप्पा साळुंके विटे, श्री. दत्तकुमार कळसकर, मुंबई, श्री. परमेश्वर, हेडमास्तर साऊथ इंडियन हायस्कूल, माटुंगा (गायन) श्री. गोपाळबुवा कुटेवाले, दांडाखार. श्री. शंकरबुवा दांडेकर, दांडाखार श्री. शंकरबुवा चौरीकर, नागपूर (हार्मोनियम वादन) श्री. जी. एस. साटम, मुंबई. (व्हॉयलिन) श्री. सी. बी. करमरकर (गायन) श्री. वाय. जी. पत्की (वायलीन) श्री. व्ही. एन्. पोतदार (गायन) श्री. बी. एस. सातर्डेकर (व्हॉयलिन) श्री. वामनराव आपटे (गायन) श्री. शांताराम मसलुसे (तबला) श्री. एस. एल. गायकवाड (हार्मोनियम) श्री. बाबालाल इस्लापूरकर (तबला) श्री. सुरेंद्रराव गायनमास्तर संगीत गायन वादन विद्यालय, दादर, मुंबई. श्री. विठ्ठलबाबू कुलेंकर (गायन) श्री. सुशिला बाळकृष्ण, पुणें (गायन) महाशिवरात्र व रंगपंचमी या दोन दिवशीं श्रींचे रथाची व पालखीची गांवांतून मिरवणूक सालाबादप्रमाणें झाली. या महिन्यांत संस्थानच्या धर्मार्थ दवाखान्यांत १४७२ रुग्णावर उपचार करण्यात आले.

## एप्रिल १९५६

या महिन्यांत श्रीसाईदर्शनासाठीं बाहेर गांवचे भक्त लोक बरेच आले होते. त्यापैकी अनेक कलाकारांनीं श्री समोर हजेरी दिली त्यांतील कांहीं कार्यक्रम पुढीलप्रमाणें.

**कीर्तन** :- वे. शा. सं. पादुरी, मधुसुधन शास्त्री पट्टापुरा, जि. कुंटुर, संस्कृत भाषेत कीर्तन. ह. भ. प. तुकाराम बुवा आजेगांवकर, श्रीमती कृष्णाबाई येवलेकर सावा, श्री गंगाबाई, नाशिक, श्री. सौ. सरस्वतीबाई वैद्य, मुंबई, सं. गवई यांचे श्री. एकनाथशष्ठीनिमित्त कीर्तन. फा. वा ११ श्री. केळकर यांचे कीर्तन झाले.

**गायन–वादन** :—श्री. सी. एच. सत्यनारायणम् भीमावरम् (तबलावादन) श्री. टी. एच. कृष्णमूर्ती भीमावरम् (फिडल), श्री. पार्वतीकुमार आणि पार्टी, मुंबई, (नृत्य), कु. इना गायतोंडे, (गायन), सौ. पद्मा राघवन (पखवाज), श्री. चंद्रशेखर पिल्ले, मुंबई, श्री. सूर्यकांत मोहिले मुंबई. सौ. शांता कुलकर्णी, सांगली, श्री. वसंत रघुनाथ कुलकर्णी, कल्याण, श्री. एम. श्रीनिवास, परेल, मुंबई, श्री. एम्. पांडुरंग, परेल, (ब्याजू वाद्य), श्री. सुधीर कर्वे, कल्याण, कु. सिंधू गजानन दाभोळकर, वांद्रा, (नृत्य) श्री. ठाणेदार राहता. श्री. दत्तोबा तांबे, संगीत हजेरी. श्री शिर्डीश्वर गायन भजनी मंडळी, खार, मुंबई, (हजेरी) श्री. संपत बच्चू, अहेर निलवंडी, संगमनेर, जादूचे प्रयोग, श्री. मोरेश्वर बालकृष्ण हातोडे, मालाड, (गायन) श्री. कमलाकर द्वारकानाथ महंत, मालाड, (तबला वादन).

संस्थानच्या धर्मार्थ दवाखान्यास डॉ. डी. एस. राजे व मिसेस राजे, शिवडी, मुंबई यांचेकडून १०१ रुपये, श्री. एम्. एस. मायकर, दादर, मुंबई यांचेकडून २५ रुपये देणगी म्हणून आले. तसेच या महिन्यांत १७४४ रुग्णांवर उपचार करणेत आले.

## मे १९५६

**या** महिन्यांत श्रीसाईदर्शनासाठीं बाहेरगांवचें भक्तांची दररोज रीघ होती. अनेक कलाकारांनीं शिरडीस येऊन श्रीसमोर हजेरी दिली. त्यांतील कांहीं कार्यक्रम पुढीलप्रमाणें :—

**ए. आर. सावंत ॲन्ड ब्रदर्स**
३६३, मंगळदास मार्केट समोर, मुंबई नं. २.
ARSA PRODUCTS
❀ होजियरी ❀ तयार कपडे ❀ फर्निशिंग फॅब्रीक्स
व इतरसर्व तऱ्हेच्या कापडाचे व्यापारी
रिटेलर्स व होलसेलर्स टे. नं. २२८४४

**कीर्तनः**—ह. भ. प. सदाशिव केशव दसनूरकर, राममंदिर, नाशीक, ह. भ. प. शांतारामबुवा भालेदकर, बोदवड. (पू. खा.), श्री. ह. भ. प. शंकर वामन वाघमारे मु. अकोला, (वऱ्हाड) सं. ग. श्री. मराठे यानीं चैत्र व॥ ११॥ व श्री अक्कलकोट स्वामी पुण्यतिथी निमित्त श्री परशराम-जयंती निमित्त अशीं ३ कीर्तनें केलीं.

**प्रवचनः**—श्री. वे. शा. सं. भागवत, शंकरबुवा पंढरपूरकर, श्री. डॉ. गव्हाणकर स. अ. ( सं. क. शिर्डी ), श्री. दत्तात्रय शंकर टिपणीस, ठाणे.


**नकलाः**—ओनाप के गावकर, मुंबई.

**नृत्यः**—सौ. श्रीलेखा कैकिणी, माटुंगा, मुंबई.

**गायन-वादन संगीत भजनः**—श्री. मधुकर गांगुर्डे, धुळे, श्री. गणेश कुमार साठे, पो. इ. आगाशी, जि. ठाणे, सौ. विजयालक्ष्मी आर. परब, माहीम, मुंबई. श्री. कृष्णराव विठ्ठल कऱ्हाडकर, मुंबई. श्री. केशवबुवा इंगळे, माधव संगीत विद्यालय पुणें. श्री. नागेश बाळकृष्ण बांदेकर, बेळगांव. कु. सुमती दादाबो ठाकूर, मु. दहीसर, जि. ठाणें. श्री. राजाभाऊ कोकणे नागपूर, श्री. भास्करराव मांडके, पुणें. श्री. बहिरव अनंत काळे. चिंचोली. जि. सातारा, बाळकृष्ण अबाजी ढवणवाई तबलावादन. श्री. होमाय वकील, माहीम, मुंबई. श्री. अबदुल हमीदखाँ, मुंबई. श्री. रत्तिरमण साहू, नवापूर. श्री. गोपाळ कृष्ण बंड, केडगांव, श्री. भगवंत पांडुरंग वाघमारे, बडोदा, दिलरुबावादन. कु. पांडुरंग भगवंतराव, कु. वसंत भगवंतराव बडोदा, श्री. मदनकुमार चौधरी, बासरीवादन, डॉ. स. बा. भट, पुणें. कु. सुलोचना बाळकृष्ण खानोलकर, मुंबई. श्री. डी. एन्. नाडकर्णी, दत्त संगीत विद्यालय, गिरगांव मुंबई. वैशाख शु. १५ ता. २४।५।५६ गुरुवारीं रोजीं चंद्रग्रहणानिमित्त रात्रौ श्रींचे समाधीस स्नान अभिषेक वगैरे कार्यक्रम झाला.

या महिन्यांत संस्थानच्या धर्मार्थ दवाखान्यांत १४८८ रुग्णांवर उपचार करणेंत आले.

**—स. चिटणीस**



● दिव्याखालीं अंधार असतो, प्रकाश पडतो दूर. साधुमहापुरुषांना जवळचे लोक ओळखूं शकत नाहींत, दूरचे लोक मात्र त्यांचें व्यक्तिमत्व पाहून मुग्ध होऊन जातात !

# श्रीरामनवमी उत्सव

या उत्सवास सुमारे तीस चाळीस हजार भक्तलोक श्रीसाईबाबांचे दर्शन तीर्थप्रसाद घेऊन गेले. उत्सवास आरंभ शके १८७८ चैत्र शु. ८ बुधवार दिनांक १८ एप्रिल १९५६ इ. स. या दिवशीं होऊन चैत्र शु. १० शुक्रवार दिनांक २० एप्रिल १९५६ रोजीं समाप्त झाला. उत्सवांत श्रींच्या पालखीची व रथाची मिरवणूक निघालीं. उत्सवाचा मुख्य दिवस—गुरवार चैत्र शु. ९ हा होय. या दिवशीं पहाटे श्रींच्या समाधीवर अभिषेक घालणें-साठीं आठ मैलावर असलेल्या गोदावरीच्या कावडी सुमारें ३०० भक्तांनी आणल्या. त्याची मिरवणूक होऊन गंगापूजन करून त्या श्रींचे समाधीवर घालणेत आल्या. त्यानंतर श्रींचे समाधीस मंगलस्नान अभिषेक पूजन इत्यादि झाले. श्री रामजन्माचे कीर्तन श्री ह. भ. प. अनंतराव आठवले पुणें यांचे झाले. व नंतर माध्यान्ह आरती झाली, तीर्थ प्रसाद वगैरे वाटणेत आला. सायंकाळीं निशाणाची रथाची मिरवणुक निघालीं. रात्रौ प्रसिद्ध कलाकारांचे गायन भजन नृत्य वादन वगैरे रात्रभर मनोरंजक कार्यक्रम झाला. रात्रौ १२ नंतर शोभेचें दारूकाम प्रेक्षणीय असें झालें. चैत्र शु. १० शुक्रवार दिनांक २० रोजीं नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त काला—कीर्तन दहीहंडी होऊन उत्सव समाप्त झाल्याचें श्री. ह. भ. प. अनंतराव आठवले, पुणें, यांनी जाहीर केलें. उत्सवासाठीं मुद्दाम संस्थान कमेटीची मंडळी हजर होती. उत्सवासाठीं भक्तलोकांकरितां उतरणेस कापड खोल्या व शोभिवत मांडव घालण्यांत आला होता.

उत्सवांत कुस्त्यांचा फड फारच प्रेक्षणीय झाला त्यांना संस्थानतर्फे बक्षीस देण्यांत आलें. उत्सवांत प्रत्येक कार्यक्रमास (लाऊडस्पीकर) दूरध्वनिक्षेपनाची व्यवस्था करण्यांत आल्यामुळें सर्वांना तें ऐकूं येण्याची सोय झालेली होती. उत्सवांत विजेच्या दिव्याची रोषनाई उत्तम प्रकारें करण्यांत आली होती. उत्सवांत पोलीस बंदोबस्त उत्तम ठेवण्यांत आल्यानें चोऱ्यामाऱ्या फारशा झाल्या नाहींत.

पिण्याचे पाणी पुरविण्याची स्वतंत्र व्यवस्था केलेली होती. गर्दीमुळें भक्ताना उन्हापासून त्रास होऊं नये म्हणून श्रींचें मंदिराचेआंत व बाहेरील पटांगणास भव्य मंडप उभारण्यात आला होता व त्या ठिकाणीं पाणी पुरवठा असल्यानें भक्तांना शांतपणें दर्शन घेण्याची सोय झाली.

---

ताज्या सुगंधीत फुलांचा मोहक सुगंध असलेलें **अत्तर लव्ह** वापरा

**गजानन जनार्दन बोडस** अत्तरवाले

ठाकुरद्वार रोड, मुंबई २



# श्री साईलीला

शिरडी संस्थानचें अधिकृत त्रैमासिक

## या अंकांत—



- तमसो माऽज्योतिर्गमय
- सद्गुरूचा शोध
- आत्मानुभवाचें शास्त्र
- संतकवि श्री दासगणूमहाराज
- साईबाबांचा कर्मयोग
- विश्वरूपदर्शन
- आत्मानुसंधान
- रवीन्द्रनाथांचें सुवर्ण-गीत
- संपादकीय निवेदन
- बाबांची लीला; शिरडी-वृत्त वगैरे.
  आणि
- श्रीसाईनाथांच्या समाधि-मंदिरांतील मूर्तीचें अप्रतीम तिरंगी चित्र.

★

स्वरूपाचें जें विस्मरण ।
तेंचि मायेचें अवतरण ।
शुद्ध पूर्णानंदस्मरण ।
तोचि मी चैतन्य घनरूप ॥

ॐ प्रणव हा माझा वाचक ।
वाच्य तयाचा मीच एक ।
विश्वाकार वस्तु अनेक ।
त्यांतही मी एक भरलेला ॥

—श्री साईचरित





# श्री साईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत त्रैमासिक ]

**वर्ष ३३ वें : अंक ३ रा**

वार्षिक वर्गणी रु. २-४-० (ट. ख. सह)

**जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर १९५६**

संपादक—

**नागेश आत्माराम सावंत**

व्यवस्थापक—

**रामचंद्र महादेव राणे**

कार्यालय—

**ईस्ट ॲण्ड वेस्ट इं. कं. बिल्डिंग,**
**४२।१५ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुं. १**

# संपादकीय निवेदन

'श्रीसाईलीला' हें त्रैमासिक आहे. म्हणजे दर तीन महिन्यांनीं एकदां अंक निघतो. अंकाची पृष्ठसंख्याहि मर्यादित आहे. साधारण अठ्ठेचाळीस ते चौसष्ट. तेव्हां अंकांतलि विषयाचें स्वरूप व त्यांतील विविधता जास्तींत जास्त आकर्षक कशी करतां येईल याकडे आमचें सदैव लक्ष असतें. अनेक लेखकांकडून जो मजकूर येतो त्याची निवड करतांना लेखकाचा तद्विषयक अभ्यास, व्यासंग आणि भाषाशैली यांना साहजिकच महत्त्व दिलें जातें. 'नापसंत' लेख परत केल्यावर 'हा लेख का नापसंत केलात तें कृपा करून कळवा' अथवा 'आमचा लेख दुरुस्त करून कां छापीत नाहीं' अशा तऱ्हेचीं त्या लेखकांचीं पत्रें येतात. श्रीसाईलीलेंत प्रसिद्ध होत असलेलें साहित्य सदरहू लेखक अभ्यासाच्या दृष्टीनें वाचतलि तर त्यांना आपोआपच साईलीलेला कुठल्या प्रकारचें लेखन सहाय्य हवें आहे याची सहज कल्पना येऊं शकेल असें आम्हांला वाटतें. कविता फार येतात. त्यांत अनेक वृत्तदोष, भाषादोष असतात. श्रीसाईबाबांचें त्या कवितेंत नामस्मरण आहे, एवढ्यावरून तें 'काव्य' ठरत नाहीं! त्याच प्रमाणें— अनुभव. अनुभव देतांना अवास्तव पाल्हाळ फार असतो. श्रीसाईनाथांवर ज्यांची अलोट श्रद्धा आहे त्यांच्या दैनंदिन जीवनांत अनेक तर्कातीत घटना घडतात हें मान्य आहे. पण त्या अद्भुतरम्य घटनांची पार्श्वभूमि शुद्ध हेतूंनीं प्रेरित झालेली असावी! आपल्या व्यक्तिगत दुःखांचा व संकटांचा परिहार करण्यासाठीं ज्यांनीं बाबांना आळविलें आणि करुणा भाकली त्यांच्या हांकेसरशीं बाबा धांवून आले असा अनुभव आल्यानंतर त्या भक्तांनीं बाबांवरची ही श्रद्धा अधिक व्यापक करायला नको का? व्यक्तिगत दुःखापेक्षां समष्टिगत दुःखांचा परिहार व्हावा म्हणून कधीं आम्हीं बाबांना हाक घातली आहे? गुजराथेंत धरणीकंपानें गांव उध्वस्त झाला, अति वृष्टीनें पंढरपूर क्षेत्राची मोडतोड झाली, हैद्राबादेजवळ भीषण रेल्वे अपघात घडला; या अघटित आपत्तींचें वर्णन वाचून आमचें मन व्यथित होतें. अशा-वेळीं एखाद्या भक्तसंघानें, तिथल्या जनतेची संकटांतून मुक्तता व्हावी म्हणून श्रीसाईनाथांना आळविलें, हाक घातली, नवस केला असें अनुभव–वृत्त कांहीं आम्हांला वाचायला मिळत नाहीं!

आधिभौतिक, अध्यात्मिक आणि आधिदैविक दुःखें निर्माण करणारी विश्वंभर शक्तीच त्या दुःखांचा एका अन्य मार्गानें आणि संकल्पानें परिहार करीत असते. दुःख आकाशाएवढें मोठें असतां मुंगीएवढा माणूस काय करूं शकणार, हें खरें आहे. पण परमेश्वरावरची अथवा श्री सद्गुरुवरची श्रद्धा, कितीहि थोर दुःख असो तें सहन करण्याची अथवा त्या दुःखावर मात करण्याची बुद्धि, शक्ति आणि स्फूर्ति देते यांत तिळमात्र संशय नाहीं.

तेव्हां अनुभव पाठविणाऱ्या लेखकांनीं अनुभवाची ही एक महत्वाची बाजू आहे हें लक्षांत ठेवावें.

× × ×

यंदांच्या गुरुपौर्णिमेचा उत्सव फारच गाजला. दिवसेंदिवस अशा उत्सवांना होणारी वाढती गर्दी लक्षांत घेऊन भक्तांना कांहीं सूचना कराव्याशा वाटतात. भक्तांची राहण्याची आणि जेवण्याची व्यवस्था संस्थाननें जी केली आहे त्यांत कांहीं उणिवा आहेत याची आम्हांला जाणीव आहे. त्यांतल्या त्यांत दूरवरून मुद्दाम आलेल्या परस्थ भक्तांची जितकी सोय करतां येईल तितकी करण्याची संस्थान पराकाष्ठा करीत असते. पण 'एकमेकां सहाय्य करूं' अशी भक्तांना भावना नसेल तर कांहींच सुव्यवस्था होऊं शकणार नाहीं, विनाकारण हेवेदावे आणि गैरसमज मात्र माजतील.

अशा उत्सवाच्या वेळीं सुविचारी समंजस, आणि शिस्तबद्ध स्वयंसेवकांची गरज असते. उत्सवास आलेल्या प्रत्येक भक्तानें तो भक्तहि आहे आणि बाबांचा स्वयंसेवकहि आहे, असें मानावें असें आम्हाला वाटतें. संयम, शांतता, शिस्त, स्वच्छता आणि समजूतदारपणा या सद्‌गुणांचा आम्ही हरेकानें अंगिकार केला तर आम्हास स्वयंसेवकांचीहि गरज लागणार नाहीं!

× × ×

समाधिमंदिरांत उपासनेच्या वेळीं होत असलेली गडबड आणि गबाळेपणा यांना आम्हींच आळा घातला पाहिजे. उपासना काय एकट्यानें म्हणतां येत नाहीं? पण ज्यावेळीं आम्ही संघरूपानें एकत्र येतों तेव्हां संघात्मतेचे नियम आम्हीं पाळले पाहिजेत माझ्यामुळें माझ्या शेजारीं उभे असलेल्या उपासकाला अडचण होत नाहीं ना, त्याची तल्लीनता भंग पावत नाहीं ना, या बाबतींत आम्ही सावधचित्त असायला हवें. उपासना म्हणजे 'नादब्रह्म'! उपासना म्हणजे शाळेंतील उजळणी अथवा परवचा नव्हे!...साधकांची वृत्ति स्थिर, सावध आणि तद्रूप झाल्याखेरीज त्या नादब्रह्माची आम्हाला प्रचीति येणार नाहीं कीं साक्षात्कार घडणार नाहीं.

× × ×

श्री. शिर्डी संस्थानतर्फे या वर्षी विद्यार्थ्यांना आणि शिक्षण संस्थाना किती आणि कशी मदत केली गेली याचा सविस्तर तक्ता या अंकांत आम्ही दिला आहे. मदतीचा हा आंकडा असाचें वाढत ठेवणें हे सर्वस्वी भक्तांच्या दातृत्वावर अवलंबून आहे. कितीतरी विद्यार्थ्यांचे अर्ज आले होते. कर्तृत्वशाली आणि गरीब अशा विद्यार्थ्यांना मदतीचा हात देतांना शिर्डी संस्थानला किती समाधान वाटलें हें शब्दांत व्यक्त करतां येत नाहीं. पण हें सारें श्रेय बाबांचें. तेच कर्ते आणि करविते आहेत!

× × ×

श्रेष्ठ साईभक्त श्री. ना. वा. गुणाजी यांचा 'श्रीसाईगाथामृत (प्रकरण २ रें) भक्तसखा शामा' हा लेख गेल्या अंकांत प्रसिद्ध झाला होता. त्या लेखांत श्री. माधवराव देशपांडे (शामा) यांच्या वयासंबंधीं उल्लेख आलेला आहे. त्यांत चुकून एक चूक राहिली आणि कांहीं वाचकांचा गैरसमज झाला. त्याला श्री. गुणाजी यांनीं खुलासेवजा उत्तर धाडलें आहे. तें असें—